उत्कृष्ठ क्वालिटी
शेंगदाणे १०० रु.किलो
जीरा २८० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.२१० ■ रविवार ११ मे २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

# भारत-पाक युद्ध थांबले! शस्त्रसंधीसाठी दोन्ही देश तयार



## पाकचे मोठे नुकसान; उद्या दुपारी बारा वाजता होणार चर्चा

**नवी दिल्ली, दि.१०- भारत आणि पाकिस्तानमधील युद्ध अखेर थांबले आहे. दोन्ही देशांनी शस्त्रसंधीसाठी सहमती दर्शवली आहे. दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्रालयांनी अधिकृतपणे याची घोषणा केली आहे. शनिवारी सायंकाळी पाच वाजल्यापासून शस्त्रसंधीची अंमलबजावणी झाली. कर्नल सोफिया कुरेशी यांनी याबाबत माहिती देतांना गेले तीन दिवसातील प्रतिहल्ल्यात पाकिस्तानचे सर्वाधिक नुकसान झाल्याचे सांगितले.**

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दहशतवाद्यांची नऊ तळं उद्ध्वस्त करत प्रत्युत्तर दिले. यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला आहे. पाकिस्तानकडून ड्रोनच्या माध्यमातून हल्ला करण्याचा प्रयत्न केला जात असताना, भारताने मात्र ते परतून लावले आहेत. मात्र आता भारत आणि पाकिस्तान शस्त्रसंधीसाठी तयार झाले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत ही माहिती दिली. यानंतर पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इशाक डार आणि भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानेही याला दुजोरा दिला आहे.

**ट्रम्प यांनी काय म्हटले?**

अमेरिकेने मध्यस्थी केल्याने रात्रभर झालेल्या प्रदीर्घ चर्चेनंतर, मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की भारत आणि पाकिस्तानने पूर्ण आणि तात्काळ युद्धबंदीवर सहमती दर्शविली आहे. कॉमन सेन्स आणि आपल्या हुशारीचा वापर केल्याबद्दल दोन्ही देशांचे अभिनंदन. या प्रकरणाकडे लक्ष दिल्याबद्दल धन्यवाद, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

**पाकच्या परराष्ट्रमंत्र्यांची पोस्ट**

पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इशाक डार यांनीही पोस्ट शेअर करत याला दुजोरा दिला आहे. पाकिस्तान आणि भारत यांनी तात्काळ प्रभावीपणे युद्धबंदीवर सहमती दर्शविली आहे. सार्वभौमत्वाशी आणि प्रादेशिक अखंडतेशी तडजोड न करता पाकिस्तानने नेहमीच या प्रदेशात शांतता आणि सुरक्षिततेसाठी प्रयत्न केले आहेत, असे त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

**भारताकडून दुजोरा**

भारत आणि पाकिस्तानमधील गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याबाबत दोन्ही देशांनी थेट चर्चा केली. पाकिस्तानच्या डीजीएमओने (पान ८ वर)



## राज्यभरात आज तिरंगा रॅली

मुंबई, दि.१०- राज्यातील महायुती सरकारकडून विविध जिल्ह्यात ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ रविवार दि.११ मे रोजी पायी यात्रेचे आणि तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीत सैन्य दलाच्या समर्थनार्थ आणि भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. (पान ८ वर)

## दोन चिमुकल्यांसह मातेने केली विहिरीत उडी मारुन आत्महत्या

### नंदुरबारमधील घटना

**नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी) - दोन चिमुकल्यांसह मातेने शेतातील विहीरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना नंदुरबार तालुक्यातील वावद गावाच्या शिवारात घडली. या घटनेची माहिती मिळताच जमलेल्या लोकांनी लोखंडी आकडे व दोराच्या सहाय्याने मायलेकांना विहीरीतून बाहेर काढले. या घटनेत मातेसह दोन व चार वर्षीय दोन्ही चिमुकल्यांचा मृत्यू झाला.**

याप्रकरणी नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून सदर घटनेने परिसरात खळबळ उडाली. नंदुरबार तालुक्यातील वावद येथील ममता गणेश हरदास (वय २५) या महिलेने आपल्या दोन चिमुकल्यांसह शेत शिवारातील विहीरीत उडी मारली. मुलगी विद्या गणेश हरदास (वय ४ वर्ष), मुलगा साई गणेश हरदास (वय २ वर्ष) या दोन्ही मुलांना घेवून महिलेने विहीरीत उडी मारल्याचे कळताच लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. लोखंडी आकडे व दोराच्या सहाय्याने विहीरीतील मायलेकांना बाहेर काढून नंदुरबार जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतू वैद्यकिय (पान ८ वर)

## गौतम बुध्द जयंती महाप्रसादाचे वाटप



धुळे, दि.१०-शहरातील स्टेशन रोड स्नेह नगर कमलकुंज येथे दि.१२ मे रोजी सकाळी दहा वाजता भगवान गौतम बुध्दांच्या दोन हजार पाचशे अठ्ठयाऐंशीवी जयंती निमित्त महाप्रसादाचा व भोजनाचा कार्यक्रम महेंद्र निळे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.दिपप्रज्वलन डॉ.जगदीश पाखरे, डॉ.कृष्णमोहन सैंदाणे, माजी न्यायाधीश ॲड.रमेश सोनवणे, डॉ.सुरेंद्र झेंडे, व्यंकटेश भैय्या, साहेबचंद जैन, विशाल केले, अजय (पान ८ वर)

## तापी मेगा रिचार्ज प्रकल्प : महाराष्ट्र-म.प्र.त ऐतिहासिक करार
## विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला सिंचनलाभ

**भोपाळ, दि.१०- तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांमध्ये एका ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सुमारे १९ हजार २४४ कोटींच्या या करारामुळे विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला मोठा लाभ मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भोपाळ येथे दिली.**

सिंचन आणि जलविद्युत प्रकल्पांबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची बैठक आज भोपाळ येथे झाली. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव, दोन्ही राज्यांचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, तुलसीराम सिलावट, कुंवर विजय शाह आणि दोन्ही राज्यांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना याबाबत माहिती दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आजचा दिवस हा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशसाठी ऐतिहासिक आहे. ताप्ती मेगा रिचार्ज प्रकल्पाचा आम्ही पूर्वीच संकल्प केला होता. आज त्यावर दोन्ही राज्यांनी सहमती केली आणि त्यासाठी सामंजस्य करार झाला. यापूर्वी ही बैठक २००० मध्ये बैठक झाली होती, त्यानंतर २०२५ मध्ये ही बैठक झाली. परंतू या प्रकल्पाबाबत दोन्ही राज्य परस्परांच्या संपर्कात होते. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी आंतरराज्य जलकरारांना गती देण्यास सांगितले आणि २०१६ पासून आम्ही याला गती दिली. तापी मेगा रिचार्ज हे जगातील एक आश्चर्य आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला २,३४,७०६ हेक्टरला सिंचनलाभ होईल, तर मध्यप्रदेशला १,२३,०८२ हेक्टर सिंचनलाभ मिळेल. महाराष्ट्रात जिथे खारपाणपट्टा आहे आणि त्यामुळे पिण्याच्या (पान ८ वर)

## विहिरीत पडल्याने एकाचा मृत्यू

धुळे, दि.१०- धुळे तालुक्यातील चांदे गावातील सत्तावीस वर्षीय इसमाचा विहिरीच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, चांदे येथील प्रदीप दत्तु पाटील (वय २७) हे दि.९ मे रोजी सकाळी सात वाजेच्या सुमारास विहीरीत बुडालेल्या स्थितीत आढळून आले. घरातुन बेपत्ता असल्याने त्यांचा शोध सुरू असतांना विहीरी-जवळ प्रदीप पाटील यांची चप्पल आढळून आली. विहिरीत डोकावून पाहिले असता प्रदीप पाटील हे बुडालेल्या स्थितीत दिसले. परिसरातील नागरिकांच्या मदतीने बाहेर काढून जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता मयत घोषित केले.

## भावाच्या लग्नासाठी सुट्टीवर, कॉल आला अन् सीआरपीएफ जवान भारतमातेच्या सेवेस रवाना

**नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी) - भारत व पाकिस्तान या दोन देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती सुरू आहे. त्यामुळे सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत. नंदुरबार येथील सुपुत्र असलेले केंद्रीय सुरक्षाच्या दलातील जवान किशोर भगवान माळी यांनाही तात्काळ सैन्य दलाने बोलविले. केंद्रीय सुरक्षा दलाच्या जवानाने भावाच्या लग्नासाठी सुट्टी काढली. तो गावाकडे आलाही, मात्र अचानक सुट्टी रद्द झाल्याचा फोन आला. त्यामुळे लग्न सोडून भारतमातेच्या रक्षणासाठी कर्तव्यावर रुजू होण्यासाठी तो रवाना झाला.**



लग्नाला चार दिवस बाकी असताना सुट्टीवर आलेला जवान माघारी परतला. जेमतेम २४ तासही तो गावात थांबला नाही. भावाच्या लग्नापेक्षा देशसेवेला प्राधान्य देणाऱ्या जवानाला डीजेच्या तालावर देशभक्तिपर गाणी लावून मिरवणूक काढून शुभेच्छा देण्यात आल्या. माळीवाड्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहून त्याला रवाना केले.नंदुरबार शहरातील माळीवाडा परिसरात राहणारे किशोर भगवान माळी केंद्रीय सुरक्षा दलात कार्यरत आहेत. त्यांच्या काकांचा मुलगा प्रकाश श्रावण माळी याचे १४ तारखेला लग्न होते. त्यामुळे किशोर माळी हा जवान लग्नासाठी सुट्टी घेऊन आठ मे रोजी रात्री उशिराने नंदुरबार येथे दाखल झाला. भारत व पाकिस्तान या दोन देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती सुरू आहे. त्यामुळे सुट्या रद्द करण्यात आल्या (पान ८ वर)



## धुळ्यातील राष्ट्रीय लोक अदालतमध्ये विविध प्रकरणांचा झाला निपटारा

**धुळे, दि.१०- राष्ट्रीय विधी प्राधिकरण दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी प्राधिकरण, ना. उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशान्वये धुळे जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांत राष्ट्रीय लोक अदालत घेण्यात आली. त्यात न्यायालयातील प्रलंबित चार हजार तीनशे पंच्याऐंशी विविध प्रकरणे ठेवण्यात आली. त्यापैकी एकशे पासष्ट प्रलंबित प्रकरणे व चार हजार एकशे बासष्ट दाखलपुर्व प्रकरणे असे एकुण चार हजार तीनशे सत्तावीस प्रकरणे सामोपचाराने निकाली निघाली. लोक अदालतध्ये सात कोटी सत्तर लाख चौतिस हजार रूपयांची वसुली झाल्याची माहिती धुळे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश संदीप वि.स्वामी साहेब यांनी दिली.**

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये धनादेश न वटल्याबाबतच्या केसेस, मोटार अपघात भरपाई प्रकरणे, कौटुंबिक वाद प्रकरणे ठेवण्यात आली. त्याच प्रमाणे वादपुर्व पंच्चावन्न हजार तीनशे चौऱ्याहत्तर प्रकरणे ज्यामध्ये ग्रामपंचायत, विज थकबाकी प्रकरणे, बँकेची थकबाकी प्रकरणे, फायनान्स कंपनीचे थकबाकी प्रकरणे ठेवण्यात आली. सदर लोकअदालत जिल्हा विधी प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश धुळे अध्यक्षा मा.माधुरी (पान ८ वर)

## रेडक्रॉस दिनानिमित्त कार्यक्रम उत्साहात

धुळे, दि.१०- जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त मानवतेसाठी कार्य करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले. पारोळा रोड परिसरातील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे विविध वाहनांना रिफ्लेक्टर बसविण्यात आले. त्यासाठी रेडक्रॉस सोसायटीच्यावतीने चालक, वाहनांमध्ये जनजागृती करण्यात आली. वाहनांना उच्च प्रतीचे रिफ्लेक्टर मोफत लावण्यात आले. शाखेचे अध्यक्ष डॉ.महेश घुगरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंजि. चंद्रशेखर पाटील, जयंत वैद्य, विजय पिंगळे, अजय कासोदेकर, गिरीष मयुर, युगल काबरा, डॉ.दिनेश जावरे, डॉ.आर.एम.पाटील, डॉ. दीपक पाटील, डॉ.कौस्तुभ साळुंके, तेज राठोड यांनी परिश्रम घेतले.

## पाकिस्तानी हॅकर्सपासून सावधान
## ॲड.चैतन्य भंडारी यांचे आवाहन

**धुळे, दि.१०- सध्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात युध्दसदृश्य स्थिती असून पाकिस्तानी हॅकर्स यांनी भारतीय नागरीकांना सोशल मिडीयाव्दारे फसवण्यास सुरुवात केलेली आहे. जेणेकरुन भारतीय नागरीकांची आर्थिक फसवणुक होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे आपल्याला अज्ञात नंबरव्दारे (म्हणजे अननोन नंबर वरून) डान्स ऑफ द हिलरी असे मजकुर लिहून येणारे व्हिडीओ, फोटो किंवा लिंक येत असेल तर ते डाउनलोड किंवा क्लिक करु नका, असे आवाहन ॲड.चैतन्य भंडारी यांनी केले आहे.**

आपण फेसबुक, इन्स्टाग्राम वापरत असतांना कुठल्याही चुकीच्या पोस्टला लाईक, कमेंट आणि शेअर करणे टाळा किंवा शेअर करु नका, व्हॉटसअँप किंवा इतर सोशल मिडीया वेबसाईट वापरत असतांना अज्ञात नंबरव्दारे ऑपरेशन सिंदूरच्या नावाने येणाऱ्या बनावट व फसव्या एपीके फाईल्स किंवा पीडीएफ फाईल्स डाउनलोड करु नका. कारण त्यात वायरस असू शकतो. ज्याद्वारे तुमच्या फोनमधील गुपित माहिती चोरली जावू शकते. म्हणून नागरीकांनी व्हॉटस अँपपच्या (पान ८ वर)

## एसव्हीकेएम अभियांत्रिकीला आंतरराष्ट्रीय संस्थेकडून निधी

धुळे, दि.१०- येथील एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयाला आंतरराष्ट्रीय आय.ई.ई.ई. संस्थे कडून ३५० डॉलर इतका निधी मंजूर झाला आहे अशी माहिती विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ.विशाल मोयल यांनी दिली. आय.ई.ई.ई. हि एक आंतरराष्ट्रीय नामांकन प्राप्त असलेली जगातील सर्वात मोठी संस्था असून तिची एक शाखा आणि कम्युनिकेशन सोसायटी एस.व्ही.के.एम. इन्स्टिट्यूट ऑफ (पान ८ वर)

## कर्ज काढून देण्याचे अमिष दाखवले सुरतच्या इसमाविरूध्द गुन्हा दाखल

**धुळे, दि.१०- शिंदखेडा तालुक्यातील बेटावद गावातील व्यक्तीला व्यवसायासाठी शंभर टक्के कर्ज काढुन देण्याचे अमिष दाखवून फसवणुक करणाऱ्या सुरतच्या इसमाविरूध्द न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, सुरत पांडिसरा कैलास चौकडी येथील गौतम नानाभाऊ शिरसाठ या कर्ज उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया करून देणाऱ्याने शिंदखेडा तालुक्यातील बेटावद गावातील हेमंत प्रकाश शिरसाठ यांना व्यवसायासाठी शंभर टक्के व्यावसायिक कर्ज काढून देण्याचे अमिष दाखवले. यासंदर्भात हेमंत शिरसाठ यांच्या एका अर्जावर सह्या तसेच पॅनकार्ड, आधार कार्ड व रहिवास दाखला घेतला. आधारकार्डच्या सहाय्याने मुडावद येथे पंजाब (पान ८ वर)

## सैनिकहो, तुमच्यासाठी.. नंदुरबारात आज शिवसेनेची भव्य तिरंगा मोटर सायकल रॅली

**नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी) - देशाच्या सीमेवर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीत सैनिक अहोरात्र डोळ्यात तेल घालून मातृभूमीच्या रक्षणासाठी नापाक पाकड्यांना धूळ चारत आहेत. अशा परिस्थितीत सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी शहरातून शिवसेनेचा वतीने रविवारी तिरंगा मोटार सायकल रॅली काढण्यात येणार असून, सर्व नागरिकांनी रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा विधान परिषद सदस्य आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी केले आहे.**

पहलगाम हल्ल्यानंतर जांबाज सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर राबविले. त्यानंतर भारतीय सैनिकांनी दहशतवादी अड्डे नेस्तनाबूत करीत नापाक पाकिस्तानवर हल्ले करीत त्यांचे मनसुबे उधळून लावलेले आहेत.देशाच्या सीमेवर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीत सैनिक अहोरात्र डोळ्यात तेल घालून मातृभूमीच्या रक्षणासाठी पाकड्यांना धूळ चारत आहेत. रविवार (दि.११) रोजी आपल्या भारतीय सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी उपमुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशान्वये आणि शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा विधान परिषद सदस्य आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या नेतृत्वाखाली नंदुरबार शहरातून तिरंगा मोटर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. स.१० वाजता सीबी पेट्रोल पंपापासून रॅलीला सुरुवात होईल. गिरिविहार गेट, उड्डाणपूल, हाटदरवाजा, सोनार खुंट, जळका बाजार, मोठा मारुती चौक,अंधारे चौक, आमदार कार्यालय, नगरपालिका व तेथून नेहरू चौकात रॅलीचा समारोप होईल. तिरंगा मोटार सायकल रॅलीत सर्व नागरिकांनी, शिवसैनिक शिवसेना पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सैनिकांचे मनोबल उंचावावे असे आवाहन आमदार चंद्रकांत रघुवंशी, शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड.राम रघुवंशी यांनी केले आहे.

## पोस्टातील तिजोरी फोडण्याचा प्रयत्न

धुळे, दि.१०- जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात असलेल्या भारतीय डाकघरात अर्थात पोस्ट ऑफीसमध्ये घुसून तिजोरी फोडण्याचा अयशस्वी प्रयत्न चोरट्यांनी केल्याचे उघडकीस आले आहे.पोस्ट ऑफीसमधील तिजोरी अज्ञात चोरट्यांनी फोडल्याची खबर मिळताच शहर पोलीस स्टेशनचे पोनि. दिपक पाटील, हेकॉ.रवी राठोड, धम्मपाल वाघ, महेश मोरे, स्थानिक गुन्हे शाखेतील योगेश जगताप, सुप्रिया वर्जिकर, डाक सहाय्यक दीपक देशमुख, सहा.अधिकारी विकास कुमार गुप्ता, ठसे तज्ञ विभागाचे सपोनि.विनोद खरात, पोउनि.धनंजय मोरे यांनी तात्काळ धाव घेतली.

## लहान वयात मोठी झेप : सहावीतील सागरने एच.आर. पटेल फार्मसीत सादर केले बहुपयोगी व्हीलचेअर मॉडेल

**शिरपूर, दि.१०- येथील एच.आर. पटेल फार्मसी महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या एका विशेष कार्यक्रमात, निमझरी येथील आर.सी. पटेल प्राथमिक आश्रमशाळेतील इयत्ता सहावीतील विद्यार्थी सागर पिंट्या पावरा याने तयार केलेल्या मल्टीपर्पज व्हील-चेअर मॉडेलचे उपस्थितांसमोर सादरीकरण करण्यात आले.**



सागर पावरा याला शाळेचे मुख्याध्यापक पी.एन. लोहार, मार्गदर्शक सुनील गोपाळ यांचे मार्गदर्शन लाभले. केवळ सात मिनिटांत प्रभावी सादरीकरण व प्रात्यक्षिक सादर करून त्याने व्यवसायिक दृष्टिकोनातून विचार मांडले आणि त्याच्या या प्रभावी सादरीकरणाने सर्व उपस्थितांचे मन जिंकले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे ॲग्री सर्च प्रा. लि.चे सुधाकर गाणू यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून सागर पावरा याला एक हजार रु.रोख बक्षीस दिले. तसेच राष्ट्रीय लघुउद्योजकता व लघुउद्योग विकास संस्थेच्यावतीने त्याला शालेय किट देण्यात आले.प्राचार्य डॉ.एस.बी. बारी यांनी सागरच्या कल्पकतेचे व सादरीकरण (पान ८ वर)

## आदिवासी वनहक्क कायद्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून ठोस ग्वाही

**नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी) - सत्यशोधक शेतकरी सभा व सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेने आदिवासी वनहक्क कायद्याची अंमलबजावणीसह केलेल्या विविध मागण्यांबाबत लवकरच पुर्तता करण्यात येईल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी यांनी सत्यशोधकच्या पदाधिकाऱ्यांची बैठकीत करुन आश्वासन दिले आहे.**

नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी वनहक्क कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी यासह विविध मागण्यांसाठी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेने नंदुरबार ते मुंबई असा पायी बिन्हाड मोर्चा काढला होता. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी सदर कायद्याची अंमलबजावणी संदर्भात लेखी आश्वासन दिले (पान ८ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -89,000 रु.+3% GST
सोने- 24 K -97,200 रु.+3% GST
चांदी- 1,00000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

सेवा
सुपर स्पेशालिटी न्युरोट्रॉमा व क्रिटीकल केअर सेंटर
PATIENT SAFETY & QUALITY OF CARE NABH PRE ACCREDITED
सुप्रसिद्ध यूरोलॉजिस्ट व हृदयरोग तज्ञ यांच्याकडून
मोफत तपासणी व मार्गदर्शन शिबीर
आपणास कळविण्यात आनंद होतो कि सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर धुळे यांच्या तर्फे मूत्र रोग संबधित व हृदयरोग निदान, तपासणी व मार्गदर्शन शिबीर करण्यात आले आहे.
खालील लक्षणे आढळून आल्यास आवर्जून शिबिरात यावे.
- मूत्र रोग संबंधित आजार
- मूत्र पिंड
- मूत्र मार्ग
- मूत्राशय या सदर्भातील आजार



डॉ. आशिष छाजेड
UROLOGIST MS, MCH
- श्वास घेण्यास त्रास होणे
- हृदयाचे ठोके वाढणे
- छातीत धडधड होणे



डॉ. योगश पाटील
एमडी. डीएम ( कार्डिओलॉजी )
इंटरवेंशनल कार्डिओलॉजिस्ट
तपासणी आणि ECG मोफत ( फ्री )
२ डी इको या चाचणीसाठी 50% सूट
सोनोग्राफी अल्प दरात
वार. रविवार दि. - ११/०५/२०२५ वेळ - ११ ते ३ पर्यंत.
ठिकाण - सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर
मिशन कंपाऊंड, साक्री रोड, धुळे ✆ 02562 - 246333, 247555

# सावध रहा, जागरुक रहा!

आज जागतिक धोका म्हणून आंतरराष्ट्रीय दहशतवाद हा आहे. त्याचेच स्वरूप आपण २२ एप्रिल २०२५ ला भारतातील पहलगाम या ठिकाणी २८ निरपराध भारतीय हिंदू नागरिकांवर अमानुषपणे पाकिस्तानी दहशदवाद्यांकडून गोळीबार करण्यात आला. दहशदवादाला सडेतोड उत्तर देणे हीच आजची गरज आहे व भारत सरकारकडून 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेअंतर्गत पाकिस्तानातील नऊ आतंकवादी ठिकाणांवर हवाई हल्ला करून त्यास प्रत्युत्तर दिले व त्यात अनेक आतंकवादी मारले गेले. आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा विचार केल्यास भारताला अनेक देश पाठींबा देत आहेत व संयुक्त राष्ट्र संघात देखील भारताच्या निवेदनाला पुष्टी दिली आहे. थोडक्यात आपण शांततापूर्ण जीवन जगत असलो तरी जगात अनेकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण होते शत्रू राष्ट्राकडून हल्ला होण्याची शक्यता निर्माण झाल्यास किंवा प्रत्यक्ष युद्ध सुरु झाल्यास फक्त सैन्यच नाही तर सामान्य नागरिकांनाही योग्य खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

अशावेळी नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी व आपत्तीचे व्यवस्थापन करण्यासाठी नागरी संरक्षणाची (सिविल डिफेंस) भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. युद्ध काळात अफवांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही माहिती अधिकृत स्रोतांकडून घ्यावी. शासनाने दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे, योग्य वेळी सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा, अनावश्यक घराबाहेर पडणे टाळावे, प्रत्येक कुटुंबाने आपत्कालीन साहित्याचा संच तयार ठेवावा, विजेरी, प्रथमोपचार पेटी, कोरडे अन्न, पाण्याच्या बाटल्या, आवश्यक औषधे, काही महत्वाचे कागदपत्र समावेश असावा. विजेचा किंवा दळण-वळणाचा संपर्क तुटल्यास छोटा रेडीओ उपयोगात येतो. सिव्हील डिफेंस हि एक अशा प्रकारची संघटना आहे जी युद्ध, नैसर्गिक आपत्ती, स्फोट, आग किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी कार्यरत असते. त्याचे सदस्य नागरिकांना मदत करतात. सुरक्षित स्थळी पोहचवतात व प्राथमिक उपचार करतात तसेच लोकांना योग्य सूचना देतात. सरकारच्या सूचनांनुसार मदतकार्या करीत असतात. त्यात त्यांना सायरन वाजविणे, लोकांना योग्य सूचना देणे, जमावाला नियंत्रणात आणणे अशी कामे करावी लागतात. प्रत्येक नागरिकाने आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या सुरक्षेसाठी साजक राहणे हेच खरे देशप्रेमाचे लक्षण आहे. नागरी संरक्षण क्षेत्रात गाव स्तरावर व जिल्हा स्तरावर अनेक शासकीय व निमशासकीय यंत्रणा सहभागी असतात त्यांची जबाबदारी युद्ध आपत्ती किंवा आणीबाणीच्या वेळी नागरिकांचे रक्षण करणे, मदत पुरवणे आणि व्यवस्थापन करणे या स्वरूपात असते. यात गावस्तरावर ग्रामपंचायत, आरोग्यसेवक, आशा कार्यकर्त्या, स्थानिक पोलीस पाटील/तलाठी, स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, शाळा व शिक्षकवर्ग तसेच जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पोलीस विभाग, आरोग्य विभाग/ जिल्हा रुग्णालय, अग्निशमन दल, महसूल व पाणीपुरवठा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांचा अंतर्भाव असतो. नागरी संरक्षण अंतर्गत युद्धजन्य परीस्थितीत नागरिकांचे जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी काही महत्वाच्या उपयोजना केल्या जातात. त्यात रात्रीच्या वेळी हवाई हल्ल्यात शत्रूच्या विमानांना लक्ष्य ओळखता येऊ नये म्हणून शहरातील सर्व प्रकारचे दिवे बंद ठेऊन अंधार (ब्लॅकआऊट) केला जातो तसेच नागरिकांना पूर्व सूचनेसाठी विशेष सायरन वाजविले जातात. त्यामुळे लोकांना सुरक्षित स्थळी जाऊन आश्रय घेता येतो तसेच जमिनीखाली बांधलेल्या आश्रय स्थळात म्हणजेच बॉम्ब शेल्टर्स मध्ये नागरिक आश्रय घेऊ शकतात. आग प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी विशेष प्रशिक्षित कर्मचारी जबाबदारी सांभाळतात. प्रथमोपचार केंद्रांच्या माध्यमातून उपचार केले जातात. नागरिकांना आपत्तीचे प्रशिक्षण, प्रथमोपचार व बचावकार्य याविषयी प्रशिक्षण दिले जाते, खाद्य व पाण्याचे साठे सुरक्षित ठेवले जातात, महत्वाच्या मार्गावर नियंत्रण ठेऊन तेथे गर्दी होऊ न देता संपर्क व्यवस्था कार्यरत ठेवावी लागते. युद्धजन्य परिस्थितीत नागरिकांनी भान ठेऊन आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. आपल्या भारताचे सैन्यदल सक्षम तर आहेच त्याचबरोबर सैन्यदलाच्या दुय्यम संघटना जसे सीमा सुरक्षा दल आसाम रायफल्स, कोस्टगार्ड संघटना, गृहरक्षक दल, राष्ट्रीय छात्रसेना आदी देशपातळीपासून गाव पातळी पर्यंत कार्यरत असतात. दोन राष्ट्रात संघर्ष निर्माण झाल्यास सर्वंकष युद्धा ऐवजी मर्यादित युद्धपद्धतीच्या मार्गानेच प्रश्न सोडवणे याकडे संपूर्ण जगाचा कल असतो. कारण सर्वंकष युद्धात जगातील कोणतेही राष्ट्र अलिप्त राहू शकत नाही. कारण या विज्ञान व तंत्राद्यानाच्या युगात अत्यंत विध्वन्सक व विनाशकारी शस्त्रांची निर्मिती हि जगभरात झाली असल्याचे यापूर्वी जगाने अनुभवले आहे. शेवटी युद्ध ही दररोज घडणारी बाब नाही व एखाद्या प्रश्नावरील अंतिम पर्याय म्हणून युद्धाकडे पहिले जाते आणि म्हणूनच सर्व भारतीयांनी सावध राहून अशा परिस्थितीला धैर्याने सामोरे जावे कारण प्रत्येक नागरिक हा राष्ट्राचा सैनिकच असतो.

**-प्रा.रविंद्र पंढरीनाथ टाकणे**
(संरक्षणशास्त्र),
मो.९९२१३७३२०८

# धुळ्यातील भगवान नृसिंह मंदिरात नवरात्रोत्सवाला सुरूवात आज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**धुळे, दि.१०- भगवान नृसिंह जयंती ११ मे रोजी धुळे शहरात मोठया उत्साहात साजरी होणार आहे. नृसिंह जयंती निमित्त मंदिर व्यवस्थापनातर्फे नवरात्र उत्सव साजरा होत आहे. नवरात्रोत्सवाला सुरूवात करतांना आता दररोज ११ मे पर्यंत विधिवत आरती, अभिषेक आणि नाम जप केला जाईल. जयंतीच्या दिवशी ११ मेस भगवान नृसिंहांना ५६ पदार्थांचा भोग चढवुन आरती होईल. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले होईल. भाविकांनी भगवान नृसिंह जयंती निमित्त होणा-या कार्यक्रमांना हजर रहावे, असे आवाहन मंदिराच्या पुजा-यांनी केले.**

शहरातील आग्रा रोडवर खंडेराव बाजार परिसरात भगवान नृसिंहांचे मंदिर आहे. या मंदिरात दरवर्षी जयंती पुर्वी नवरात्र उत्सव साजरा केला जातो. यंदा ११ मेस भगवान नृसिंह जयंती आहे. त्यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. नवरात्रोत्सवात सध्या दररोज विधिवत आरती, अभिषेक आणि नाम जप केला जातो. जयंतीच्या दिवशी ११ मेस भगवान नृसिंहांना ५६ पदार्थांचा भोग चढवुन आरती होईल. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले केले जाईल. जयंती निमित्त १२ मेस भाविकांना भंडा-यांतील महाप्रसाद दिला जाईल. नृसिंह जयंती निमित्त होणाऱ्या कार्यक्रमांना भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मंदिराच्या पुजा-यांनी केले. नृसिंह अवतार हा भगवान विष्णूंच्या दशावतारापैकी चौथा अवतार मानला जातो. वैशाख शुद्ध चतुर्दशीला हिरण्यकश्यपू या राक्षसाच्या नाशासाठी देवाधिकांच्या विनंतीनंतर भगवान विष्णूंनी नृसिंहांचा अवतार धारण केला, असे सांगितले जाते. देशभरात ११ ठिकाणी नृसिंह महाराजांचे मंदिर आहे. त्यात धुळयाच्या मंदिराचा समावेश आहे.

# मोहाडी उपनगरात आता नगरोत्थानातून विकासकामे

धुळे- शहरातील प्रभाग क्रमांक १८ मध्ये मोडणाऱ्या मोहाडी उपनगरात नगरोत्थान योजनेतुन विकास कामांना सुरूवात झाली. बंदिस्त गटारसह काँक्रीटीकरणाचा रस्ता साकारण्यात येत असुन या कामाचा शुभारंभ आमदार अनुप अग्रवाल यांच्या हस्ते झाला. या कामावर १ कोटी २५ लाख रूपये खर्च होणार आहेत. मोहाडी उपनराचे क्षेत्र धुळे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १८ मध्ये येते. गेल्या पाच वर्षात या प्रभागाचे प्रतिनीधीत्व राजेश पवार यांनी केले. त्यांनी त्यांच्या कार्याकाळात या भागातील विकास कामांचा प्रस्ताव नगरोत्थान योजनेतुन दिला होता. उपनगरातील हॉटेल अमृतपासुन पुढे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करावे आणि बंदीस्त गटार साकारण्यात यावी, असा प्रस्ताव मंजुर झाला. या कामासाठी १ कोटी २५ लाख रूपये उपलब्ध झाल्यानंतर आमदार अनुप अग्रवाल यांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले. कॉक्रीटीकरण आणि गटारीचे काम निर्धारीत वेळेत आणि गुणवत्तापुर्ण करावे, अशी सुचना आ.अग्रवाल यांनी यावेळी केली.

# गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याचे राज्य अध्यक्ष प्रफुल्लचंद्र कुमावत यांचे आवाहन



**शहादा, दि.१० (प्रतिनिधी) - नगरपालिकेतील माजी लेखा-पाल लक्ष्मण बेलदार व महिला व्हॉलंटरी शाळेच्या माजी प्राचार्या ताराबाई बेलदार यांच्याकडे गंगापूजनाच्या कार्यक्रमास कुमावत बेलदार समाजाचे महाराष्ट्र राज्याचे नूतन अध्यक्ष प्रफुल्लचंद्र कुमावत यांनी धुळे नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यानिमित्त भेट दिली.**

गेल्या दोन महिन्यापूर्वी नूतन अध्यक्ष निवडीत शिर्डी येथे झालेल्या कार्यक्रमात प्रफुल्लचंद्र कुमावत यांची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर प्रत्येक जिल्ह्यातील समाज बांधवांशी संपर्क दौरा सुरू केला. दौऱ्यानिमित्त सत्कार समारंभाच्या कार्यक्रमात पुष्पगुच्छ, हार, शाल, श्रीफळ यांचा वापर न करता कुमावत बेलदार समाजातील गरीब विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटपासाठी शैक्षणिक साहित्य द्यावे असे त्यांनी आवाहन केले. त्या आव्हानाला साथ देत अध्यक्षांना पाच डझन नोटबुक भेट म्हणून ताराबाई व लक्ष्मण बेलदार यांनी दिल्या. प्रसंगी मार्गदर्शन करताना अध्यक्ष कुमावत म्हणाले की, समाजातील तरुण उद्योजक व्हावा यासाठी इच्छुक उद्योजक तरुणांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात येणार आहे .त्या शिबिराचा लाभ तरुणांनी घ्यावा. तसेच स्वयंरोजगार करण्यासाठी लागणाऱ्या बाबींची पूर्तता करण्यात येईल. तसेच बांधकाम कामगारांना पेन्शन योजना लागू होत आहे, त्यासाठी बांधकाम कामगारांनी नोंदणी करावी असे सुचित केले. दौऱ्यात धुळे येथे नायब तहसीलदार रवींद्र बेलदार व अँड. किरण बेलदार यांच्या भेटी घेऊन समाज संघटन विषयी अध्यक्षांनी मार्गदर्शन केले.

शहादा येथील कार्यक्रमात समाजाचे मावळचे अध्यक्ष साहेबराव कुमावत, विजय कुमावत (जळगाव), मयूर कुमावत (पुणे), सचिन कुमावत (नाशिक), डॉ. निखिल कुमावत, विकास कुमावत (भुसावल) बाळू बेलदार, पत्रकार रघुनाथ बेलदार, ताराबाई बेलदार, सोमेश्वर बेलदार, घनश्याम बेलदार( मुंबई ), सुभाष बेलदार (नाशिक), राजेंद्र बेलदार (मुंबई), सुभाष कुमावत (भुसावल), अनिरुद्ध बेलदार (मुंबई), हरिश्चंद्र नागेश, प्रल्हाद बेलदार, संदीप बेलदार, विश्वनाथ कामे (छत्रपती संभाजीनगर), पोलीस पाटील निळकंठ बेलदार (लोहारा), शेखर बेलदार, ईश्वर बेलदार (असलोद ), संदीप कुमावत (मुंबई), दिलीप बेलदार (विंचूर), ईश्वर बेलदार (प्रकाशा), विशाल बेलदार, नाना बेलदा, नामदेव बेलदार, मोहन प्रकाशकर, कुमावत बेलदार संघाचे राज्याध्यक्ष प्रदीप कामे, प्रा. अनिल बेलदार, अशोक नारोळे, विनोद बेलदार, विठ्ठल बेलदार, दिगंबर बेलदार, कैलास बेलदार, डॉ.मनोज कुमार बेलदार, नाना कुमावत व धुळे नंदुरबार जिल्ह्यातील समाज बांधव उपस्थित होते.

# अवकाळी पावसाने शेतपिकांचे नुकसान आ.पावरांकडून अधिकाऱ्यांना सूचना

**शिरपूर,- शिरपूर तालुक्यात अवकाळी वादळी वाऱ्यासह पावसामुळे शेतपिकांचे व शेतीउपयोगी साहित्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून सर्व नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाई मिळावी यासाठी शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम दादा पावरा यांनी तहसीलदार महेंद्र माळी यांना ७ मे रोजी पत्र देऊन त्याप्रमाणे प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. तसेच आ. अमरिशभाई पटेल यांनीही प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.**

शिरपूर तालुक्यात व परिसरात ६ मे रोजी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला सोन्याचा घास नैसर्गिक आपत्तीमुळे हिरावुन नेला आहे. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे केळी, पपई, मका, बाजरी, टरबूज, मूग यासह अनेक पिकांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच घरांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहेत. काही ठिकाणी रस्त्यावर मोठया प्रमाणात झाडे कोलमडुन रस्ता देखील बंद झाले आहेत.अनेक ठिकाणी काढणीस आलेली पिके, आणि फळबागा खराब झाल्या आहेत, ज्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

आ.पावरा यांनी शिरपूर तालुक्यातील अनेक ठिकाणी शेती पिकांच्या व नुकसान झालेल्या भागाची पाहणी करून प्रशासनाला तातडीने पंचनामे करून या सर्व नुकसान बाबत लक्ष घालून प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या तसेच शासकीय मदत मिळवून देण्याच्या सूचना दिल्या. स्वतः आ.पावरा यांनी अनेक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या.

यावेळी आ.पावरा, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के. डी. पाटील, भाजपा शिरपूर तालुका ग्रामीण अध्यक्ष भरत पाटील, सांगवी मंडळ अध्यक्ष योगेश बादल, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष योगेश बोरसे, सरपंच संघटना अध्यक्ष योगेंद्रसिंग सिसोदिया, सरपंच राजेंद्र पाटील, सरपंच बाळासाहेब पाटील, पंचायत समिती माजी उपसभापती जगतसिंग राजपूत, तालुका सरचिटणीस जितू सूर्यवंशी, शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# वाघाडीत पटेल सीबीएसई स्कूलमध्ये कला समर्पण कौशल्य महोत्सव संपन्न

**शिरपूर, दि.१०- वाघाडी येथे जयश्रीबेन अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूल मध्ये कला समर्पण कौशल्य महोत्सव उत्साहात संपन्न झाला.**

स्कूलमध्ये भव्य कला समर्पण स्किल फेस्ट चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे ट्रस्टी अतुल भंडारी व सीईओ डॉ. उमेश शर्मा उपस्थित होते. यावेळी विविध शाखा मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका भूमिका गर्ग, मुख्याध्यापक के. राव, मुख्याध्यापिका मेघा मुंगसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मेघा मुंगसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये सादर केली, ज्यामध्ये मंडाला, वारली चित्रकला, येपन कला, लिपण कला, शोपिस बनवणे, क्लोथ फोल्डिंग, फायरलेस कूकिंग, टाय अँड डाय ह्यासारख्या कलांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सूत्रसंचालन सुचिता जैन, सुप्रिया चौधरी यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन प्रशांत पाटील यांनी केले. त्यांना सोनाली ममीडवार, प्रदीप पाटील, सिमरन कौर, अपर्णा मोकाशी, शीतल बाबर, दीपाली पाटील, भूपेश माळी, कविता पाटील, विशाल माळी, योगेश पाटील, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.



# डोंगरगाव येथील रामानंद संगीत भजन मंडळाचे वीस वर्षापासून समाज प्रबोधन

**शहादा, दि.१० (प्रतिनिधी)- तालुक्यातील डोंगरगाव येथील रामानंद संगीत भजन मंडळ गेल्या वीस वर्षापासून परिसरात विविध कार्यक्रम अंतर्गत समाज जागृतीचे काम करीत आहे.**

शहादा शहरापासून जवळच असलेले डोंगरगाव येथील रामानंद संगीत भजन मंडळ यांच्या भजन मंडळामार्फत शहादा तालुक्यातील विविध खेडो, पाडी जाऊन आपल्या मंडळामार्फत समाज जागृतीचे कार्य हाती घेतले आहे. सुमारे वीस वर्षापासून सांस्कृतिक कार्यक्रम, व्यसनमुक्ती आधारित, आंध्रश्रद्धा वर आधारित आणि आदिवासी समाजात कुपोषणावर आधारित भजनाच्या माध्यमातून समाजाला जागृत करण्याचे कार्य हाती घेतले आहे. या भजन मंडळातील प्रमुख कार्यकर्ते दिवान दौलत पवार, भगवान रणसिंग बोरसे, विजय कायसिंग ठाकरे, रमेश गंगाराम मोरे, परशुराम रेवजी सावळे, कालू सोमा बर्डे, रामसिंग सुरेश सिंग शेंमळे यांच्यासह विविध कलावंत समाज प्रबोधनाचे आपले कर्तव्य पार पाडत आहेत. उत्तर कार्य असो किंवा कोणत्याही कार्य असो हे भजन मंडळ स्वतःहून त्या ठिकाणी पोचून भजनाच्या माध्यमातून समाजाला योग्य मार्ग दाखवण्याचे कार्य सध्या या भजन मंडळामार्फत सुरू आहे.

## प्रकाश में आज राजा जानी




## शब्दकोडे क्रमांक : २१५८

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | ■ | ६ | ७ | ■ | ८ |
| ९ | | ■ | १० | | | | ११ | ■ | १२ | १३ | |
| | ■ | १४ | | ■ | | ■ | १५ | | | | ■ |
| १६ | १७ | | ■ | १८ | ■ | १९ | | ■ | | ■ | २० |
| ■ | २१ | | २२ | | | ■ | २३ | २४ | ■ | २५ | |
| २६ | | ■ | २७ | | ■ | २८ | ■ | २९ | | | |
| ३० | | ३१ | ■ | ३२ | | ■ | ३३ | | ■ | | ■ |
| | ■ | ३४ | ३५ | | ■ | ३६ | | ■ | ३७ | ■ | ३८ |
| ३९ | ४० | ■ | | ■ | ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | |
| ■ | ४४ | | ■ | ४५ | ■ | ४६ | ४७ | | | ■ | |
| ४८ | | ■ | ४९ | | | ■ | ५० | | ■ | ५१ | |
| ■ | ५२ | | | | ■ | ५३ | | ■ | ५४ | | ■ |

**आडवे शब्द :** १.पूजा-अर्चा ४. एक टिकाऊ लाकूड ६.पंथ ९.बांबू १०. एक प्रकारची बंगाली मिठाई १२. रत्न १४. कलाकारास रसिकांकडून मिळालेली पसंतीची पावती १५. मालमत्ता नावावर असलेली १६. रोख १९. मयूर २१. ताजेतवाणे २३. किनार २५. साल २६.चौक २७. वारा २८. ती-विरुद्ध २९.पाताळ ३०.गळणारा ३२.रांग ३३.संधी ३४. पचण्यास हलके असलेले ३६. संध्या ३७. □ग्रजी सालातील पाचवा महिना ३९.पाणी ४१.धोका ४३.वाणी ४४.लहान ४६.पोष्ट ऑफिस ४८.चुंबन ४९.सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांच्या सीमेवरून वाहणारी कृष्णा नदीची महत्त्वाची उपनदी आहे ५०.पलीकडे ५१.पालखी ५२. अधिपत्याखाली असलेले राज्य ५३.चारपायी ५४. सखा **उभे शब्द :** १.अर्ज २.हिंदीत-रात्र ३.देवांचे मुनी ४.मुकाबला ५. हिंदीत-घसा ७.तब्बू,मिलिंद सोमण यांचा एक सिनेमा ८.दोन आणि एक मिळून तयार होणारी संख्या ११.बिल्डिंग १३.अनावश्यक गवत १४.पायरी १७.गेलेला काळ १८. कुटूंबापाशी निग□त २०.लुग□ २२. करार २४. भित्रा २५. कैची २६. सर्पांचा राजा ३१. फणसाची एक जात ३३. मस्ती ३५. सजीव ३६. हा□ांचा सापळा ३८. चौकशी ४०.साद ४२.घरदार नसलेला ४५. पुन्हा ४७.अलमारी ४९.गंध ५१. एक पालेभाजी


### शब्दकोडे क्रमांक : २१५७ चे उत्तर


| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| च | व | □ा | र | ■ | हो | डी | ■ | पो | र | गा | ■ |
| र | स | □ | ■ | व | श | ■ | छा | प | ■ | व | र |
| ण | ■ | ला | ल | च | ■ | र | या | ■ | वि | रा | ट |
| ■ | □ा | ■ | सू | न | बा | ई | ■ | मै | ■ | न | र |
| आ | म | र | ण | ■ | व | त | न | □ा | र | ■ | ट |
| ळ | ■ | फू | ■ | सा | डी | ■ | ख | न | ■ | चा | ■ |
| स | जा | ■ | □ा | त | ■ | ख | रा | ■ | के | व | ल |
| ■ | गा | ठ | ■ | बा | क | डा | ■ | घा | ■ | ल | ■ |
| प्र | ■ | रा | त | रा | णी | ■ | प | व | न | ■ | र |
| सं | भा | व | ना | ■ | स | का | ळ | ■ | ल | व | मी |
| ग | र | ■ | व | ध | ■ | स | वा | ल | ■ | हा | ■ |
| ■ | □ | गा | ■ | रा | ग | ■ | ट | ■ | का | न | स |







आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

# बहर

ऋचा सुनील पारेख
पुणे, मो.९९३०१२१४९०



# धुलिकापट्टनम्



एक प्यारासा गांव, उसमे पीपल की छाव.
छाव में आशियां था, एक छोटा जहाँ था.
छोडकर गांव को उस घनी छाव को
शहर के हो गये है
भीड में खो गये हैं....

गावावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाच्या हृदयात ह्या ओळी वास्तव्य करून असतात.'गाव 'हे नावच मुळात मनाचा ठाव घेतं. माझं गाव धुळे. धूळ असली तरी मस्तकी लावण्यासारखी.. आई एकविरेचा उंबर, गाईच्या गोठ्यातला हंबर, लहानमोठया घरातले झुम्बर, आणि वर निळाशार अंबर, सगळंच वैभव हे माझ्या गावचं!वागदेवता मंदिर, राजवाडे संशोधन मंदिर, ही तर साहित्यिकांची मांदियाळी. साने गुरुजी, विनोबा भावेंच्या चरणकमलांनी पवित्र झालेल्या त्या भूमीची धूळ आम्ही चंदनलेप समजतो. जगण्याच्या वाटेवर, प्रत्येक वळणावर वाट बघणारं एक गाव असतं.. हो तिथेच माझं गाव असतं. ह्या माझ्या गावाच्या वाटेवर अनेक कलावंतांची आळंदी आहे. किती सांगावी ती थोरवी!

प्राचीन ग्रंथामध्ये धुळ्याचा उल्लेख 'धुलिकापट्टनम 'असा केला आहे.धनगर, गवळी समाजाच्या 'धुळोबा 'या श्रद्धास्थानावरून 'धुळे 'हे नाव पडले असावे. पेशव्यांनी त्यांच्या एका ताळेबंदात 'धुळे म्हणजे महमदपूर 'आहे असे म्हटले आहे.१८१८ मध्ये इंग्रजांनी मराठ्यांना हरवून धुळे ताब्यात घेतले. धुळे हे लहानसे खेडे होते. इंग्रजांचा प्रतिनिधी म्हणून कॅप्टन ब्रिग्ज धुळ्यात आला. त्याने धुळे हे संयुक्त खान्देशाची राजधानी म्हणून वसवायचे ठरवले. त्यावेळी धुळे, जळगाव, नंदुरबार, बऱ्हाणपूर खान्देश म्हणून ओळखले जाई. ब्रिग्जने लष्करी छावणीची आखणी केली होती. त्यामुळे जुन्या कागदपत्रावर 'छावणी 'उल्लेख मिळतो. समानांतर आडव्या उभ्या रेषेत असलेल्या गल्ल्यामुळे धुळे शहर चंदीगड पाठोपाठचे आखीव रेखीव शहर आहे.

काही लोक धुळे शहराच्या रचनेचे श्रेय सर श्री. विश्वेश्वरैय्या यांना देतात. सर विश्वेश्वरैय्या यांनी साक्री तालुक्यात दातार्ती येथे पांझरा नदीच्या खालून ३००फूट लांबीचा सायफन पद्धतीचा कालवा १३०वर्षांपूर्वी बांधला जो आजही कार्यरत आहे. एखाद्या जिल्ह्याचा सांस्कृतिक इतिहास म्हणजे काय? तसे पाहिले तर 'संस्कृती 'या शब्दाची नेमकी अचूक व्याख्या करणे हे कठीण काम वाटते. संस्कृती समाजाच्या रूढी, परंपरा, मान्यता, विश्वास, कला, विज्ञान, धर्म, आचारविचार पोशाख या सर्वांचा परिपाक म्हणजे संस्कृती. माझा गाव किंवा माझ्या खान्देशाची संस्कृती थोडक्यात प्रस्तुत करावी इतकी ती छोटी नाही आणि थोडक्यात तिला स्पष्ट करू इतकी मी मोठी नाही. तरी हा संक्षिप्त प्रयास....

धुळ्याच्या सांस्कृतिक वैभवात प्रथम स्थान येतं ते 'खान्देश कुलस्वामिनी एकविरा देवी'चे. पांझरा नदीकाठी एकविरादेवीचे भव्य मंदिर आहे. एकविरादेवी परशुरामची आई. परशुराम तिचा एकमेव पुत्र म्हणून तिला 'एकविरा 'म्हणतात. हे पाचवे शक्तिपीठ मानले जाते. इथल्या सर्व ग्रामदेवता विदर्भ कोकणापैक्षा वेगळ्या आहेत. डोंगराळ भागाची जीवनपद्धती व मैदानी भागाची जीवनपद्धती यांची येथे सरमिसळ झाली असल्यामुळे या ग्रामदेवतांचे स्वरूप वैशिष्टयपूर्ण आहे. तसेच बालाजी आणि रथयात्रा हा धुळ्याच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य घटक मानला जातो. घटस्थापना ते दसरा दहा रात्री देवांची विविध वाहने (वाघ, गरुड, मोर, नाग, घोडा )यांची छोटया रथातून मिरवणूक काढली जाते. शहराचे मानबिंदू असलेले गांधी तत्वज्ञान मंदिर, राजवाडे संशोधन मंडळ फार पूर्वीपासून सातत्याने करत असलेल्या संशोधनपर लिखाणाची प्रसिद्धी आणि वस्तूसंग्रहालय व ग्रंथालय यामुळे विशेष आदराचे स्थान लाभलेल्या संस्था आहेत.समर्थ वागदेवता मंदिर आणि त्याचे अभिमानास्पद कार्य धुळे शहराचा मानबिंदू आहेत. गांधी तत्वज्ञान मंदिर ही संस्था शिवाजीराव भावे यांच्या दीर्घकालीन वास्तव्यामुळे आणि त्यांनी अत्यंत निरलसपणे केलेले बौद्धिक मार्गदर्शन लिखाण यामुळे विशेष आस्थेचा भाग आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांचा धुळ्यात १९२६ मध्ये मृत्यू झाला.१९२७ ला धुळ्यात राजवाडे संशोधन मंडळाची स्थापना झाली. ज्यात पाच हजार मोडी हस्तलिखिते, पोथ्या, ग्रंथ, बखरी, छत्रपती शिवाजी महाराजांची दुर्मिळ पत्रं, शाहू महाराज, बाजीराव पेशवा, सवाई माधवरावांची पत्रं उपलब्ध आहेत. वागदेवता मंदिराला तर लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, इंदोरच्या महाराणी, अरविंद घोष, विनोबा भावेंनी भेटी दिल्या आहेत.

भारताचे अग्रगण्य शिल्पकार श्री. राम सुतार धुळ्याचे वैभव.जगप्रसिद्ध अजिंठा वेरूळलेण्यातील काही खराब झालेल्या लेण्यांची डागडुजी करण्याची जवाबदारी सुतार यांना सोपवण्यात आली. मुळच्या शिल्पाचे सौंदर्य आणि नजाकत अत्यंत काळजीपूर्वक जपून त्यांनी हे काम पूर्ण केले. गुजरातमधील स्टेच्यू ऑफ युनिटी १८२ मीटर उंचीच्या पुतळ्याचे ते शिल्पकार आहेत. त्यांना पद्मभूषणने सन्मानित करण्यात आले. तसेच हिंदीचे साहित्यिक डॉ. मु. ब. शाह (माझे बाबा ) धुळ्याचे ज्ञानशिखर. युवकांच्या समस्या सोडवण्यासाठी 'छात्रभारती 'ची स्थापना केली.'साने गुरुजींचे स्वप्नं आंतरभारती संस्था सुरु केली. सतत तीन वेळा हिंदी साहित्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार घेणारे ते एकमेव खान्देशी साहित्यिक आहेत. धुळ्याच्या सांस्कृतिक क्षितिजावर एक तारा उगवला त्याचे नाव पंडित श्रीपादराव नाईक. सुप्रसिद्ध गायिका अनुराधा मराठे त्यांच्या शिष्या. सरांनी सर्वप्रथम 'आदर्श संगीत विद्यालय 'स्थापन करून खान्देशांत गान परंपरा विकसित केली. आज देशभरात त्यांचे शिष्य आहेत. धुळ्याच्या मनोरंजन संस्थेने नाट्य क्षेत्रात आपला जम बसवला.श्री. रावसाहेब गरुड, मु. ब. शाह, सुरेश भतवाल, सविता नेने, यादव



खैरनार, प्रा. शेणोलीकर, रंजना खैरनार, प्रा. अनिल सोनार हे सगळेच आधारस्तंभ! लोकप्रिय दिग्दर्शक श्री सचिन गोस्वामी, कराओके किंग श्री. अरविंद पिंगळे, प्रसिद्ध गायिका मनीषा जोशी,पूर्वाश्रमिची मनीषा पवार(आमचे बालमित्र व मैत्रीण)धुळ्याचेच आणि कुठल्याही परिचयाचे मोहताज नाहीत. अहिराणी भाषेला महाराष्ट्रात लोकप्रिय करण्याचे खरे श्रेय जाते ते श्री. विश्राम बिरारी काकांना! अतिशय अवीट गोडीची गाणी चालबद्ध करून त्यांची कन्या सौ. रुचिता बिरारी हिच्या खणखणीत आवाजात कॅसेट, आणि सी. डी. च्या माध्यमातून महाराष्ट्रभर लोकप्रिय केली इतकंच नाही तर अहिराणी सिनेमादेखील काढला.

कुठल्याही पद्धतीचा गवगवा न करता साने गुरुजींच्या जगाला प्रेम अर्पावे मंत्राला अनुसरून सेवादलाचा ध्यास असणारे सेवादल सैनिक आ. स्व.शरद भानगावकर,आ. स्व. सुलभा भानगावकर, आ. स्व. अरविंद कपोले, आ. स्व. दशरथ तात्या, (काही नावं विस्मरणात गेली) आ. शरद कांबळे, आ. गिरीश भाई शाह, श्री. नितीन माने. आणि समस्त सेवादल सैनिकांचे कार्य मानाचा मुजरा करण्यासारखे आहे.

भारताचा चौथा स्तंभ म्हणजे पत्रकारिता! धुळ्यात अनेक झुंझार पत्रकार होऊन गेलेत आणि अद्यापही ही परंपरा सुरु आहे. आ. स्व. कांतीलाल गुजराती, आ. स्व. भाई मदाने, स्व. अतुलभाई जोशी आ. गो. पी. लांडगे, आ. हेमंत मदाने, आ.रमेश दाणे, आ. दत्ता बागुल,आ.विकास कपोले, आ.आशुतोष जोशी, आ. पुखराज जैन, या सगळ्यांच्या लेखण्या म्हणजे झंझावात आहे म्हटलं तर अतिशयोक्ती ठरणार नाही! आवर्जून उल्लेख व्हावा असं मातीशीच ज्यांची नाळ जुळलेली होती असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही असे आमचे आणि सगळ्यांचे लाडके दादा म्हणजे आ. स्व. वसंतराव ठाकरे! छात्रभरती अभियानासाठी जागा शोधताना हा दरियादिल माणूस एका क्षणात सांगतो घ्या माझं शेत विचार कसला करताय! राष्ट्रीय पारितोषिक विजेता शेतकरी ज्याने मातीचं सोनं केलं. पाणी अडवा पाणी जिरवा ही मोहीम काढली. त्यांनी पुढच्या पिढीला उपयोग होईल अशी अनेक माहितीपूर्ण पुस्तके लिहिली.

शब्द मर्यादेमुळे अनेक आदरणीय व्यक्ती आणि संदर्भ अक्षरात लपून आहेत. ज्या गावची 'धूळ 'ही गाते, ते गाणारे धुळे गुणगुणत नाही राहिले तरच नवल!

---

मयुरेश उमाकांत डंके
पुणे, मो.९१३०५३२९६७५

# आपली जगण्याची गुणवत्ता फक्त पैसा कशी ठरविणार?



प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्म किती वाजता, कुठे ,कधी झाला? भगवान श्रीकृष्णाचा जन्म कुठे, कधी आणि किती वाजता झाला?नृसिंह जन्म कुठल्या वेळी झाला?हनुमंतांचा जन्म कुठल्या वेळी झाला? अशा प्रकारचे काही प्रश्न मी डिसेंबर महिन्यातल्या एका सेशनमध्ये मुलामुलींना विचारले होते. समोर बसलेली सगळी मुलंमुली १३ ते २५ वयोगटातली, उच्चशिक्षित कुटुंबातली, आर्थिकदृष्ट्या सुबत्ता असलेली, नामांकित खाजगी शाळांमध्ये जाणारी होती. पण मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं त्यांना देता आली नाहीत.

मी त्यांना वेगवेगळ्या फळभाज्या, पालेभाज्या आणि फळं यांची नावं सांगून त्यांच्या सेवनातून आपल्याला कुठले घटक मिळतात,असं विचारलं. त्याचीही उत्तरं मिळाली नाहीत. घरात तुम्ही एकटेच आहात आणि भूक लागली तर तुम्ही काय करुन खाल?असं विचारल्यावर जवळपास सगळ्यांनी मॅगी नूडल्स,पास्ता, जॅम टोस्ट अशी नावं सांगितली. श्रावण महिन्यात आपल्या घरी कोणकोणते कार्यक्रम असतात? गणपती विसर्जनाच्या दिवशी गणपती घरातून बाहेर पडताना आपण उंबऱ्यापाशी काय म्हणतो? गुढीपाडवा, दसरा आणि दिवाळी पाडव्यादिवशी आपण सरस्वती पूजन किंवा पाटीपूजन करतो का?पाटीवरची सरस्वती काढता येते का? पंचामृत कसं करतात? नैवेद्याचं पान कसं वाढतात? चैत्रांगण कसं काढतात? चैत्रगौर म्हणजे काय? खंडेनवमीच्या दिवशी काय करतात?आषाढी एकादशीचं महत्त्व काय? यापैकी एकाही प्रश्नाचं उत्तर एकालाही देता आलं नाही. मग मात्र मला जरा अस्वस्थता आली.

एका जुडीमध्ये किती दुर्वा असतात?, माळावस्त्र कसं करतात?, औक्षण कसं करतात - तेलाच्या दिव्यानं की तुपाच्या दिव्यानं?, पुरणाची आरती माहिती आहे का?, धोतर कसं नेसतात ? तुमचं कुलदैवत आणि कुलदेवता माहिती आहे का?... हे प्रश्न विचारले तेव्हाही हाच अनुभव आला. अनेकांनी तर आमच्या घरी असे काही सणवार आम्ही करतच नाही. सगळे सण मोठ्या घरी असतात किंवा गावी असतात अशी उत्तरं दिली. मुलांना श्लोक,वेचे येत नाहीत. संतांचे अभंग येत नाहीत, एक तेवढी गणपतीची सोडली तर बाकी आरत्या येत नाहीत. उत्तमोत्तम कवींच्या कविता येत नाहीत. त्यांनी प्रवासवर्णनं वाचलेली नाहीत. वाचनालयात जाण्याची सवय नाही. एखादं चार ओळींचं पत्र लिहिता येत नाही. पाकिटावर पत्ता कुठल्या क्रमानं लिहितात,ते माहिती नाही. फार तर गणपती स्तोत्र, रामरक्षा,मारुती स्तोत्र येतं. पण, महिषासुरमर्दिनी स्तोत्र, पांडुरंगाष्टक, भगवद्गीतेचे अध्याय, प्रज्ञाविवर्धन स्तोत्र, आदित्यहृदय स्तोत्र येत नाही. मनाचे श्लोक येत नाहीत, करुणाष्टके ठाऊक नाहीत. संपूर्ण वन्दे मातरम् सुद्धा ठाऊक नाही.

आपत्कालीन परिस्थितीत काय कराल? असं विचारलं, तर तेही सांगता येईना. म्ब्युलन्स कशी बोलवाल? गॅस सिलेंडर लिकेज असेल तर काय कराल? कुणी लिफ्ट मध्ये अडकलं तर काय कराल? सीसीटीव्ही फुटेज पाहता येतं का? ऑफलाईन रेल्वे रिझर्व्हेशन करता येतं का? बँकेत चेक भरता येतो का? वीजबिल वाचता येतं का? पुण्यात बस ने फिरता येईल का? धान्य निवडता येतं का? हॉट प्रेस ऑईल आणि कोल्ड प्रेस ऑईल यात फरक काय असतो? पाम ऑईल म्हणजे नेमकं काय? वनस्पती तूप म्हणजे काय? कोलेस्टेरॉल म्हणजे काय? हेही कुणाला सांगता येईना...! घरातल्या सगळ्यांच्या कपड्यांना इस्त्री करता येते का? उभी इस्त्री आणि आडवी इस्त्री म्हणजे काय? वॉशिंग मशीन न वापरता कपडे धुता येतात का? शाळेतला डबा स्वतःचा डबा स्वतःला घासून ठेवता येतो का?

शर्टाचं बटण तुटलं तर लावता येतं का किंवा उसवला तर टाके घालता येतात का? गिफ्ट पॅक करता येतं का? कोऱ्या कागदांची वही शिवता येते का? भाज्या निवडता, चिरता येतात का? कंपोस्ट खत करता येतं का? फोडणी करता येते का? दह्याचं विरजण लावता येतं का? ताक करता येतं का? लोणी कढवता येतं का? मुगाची खिचडी करता येते का? असं विचारलं तर तेही येत नव्हतं. हे सगळं इतक्या स्पष्ट समोर आलं आणि त्याचीच अस्वस्थता मनातून जाता जाईना. मुलांच्या जडण-घडणीला जो सांस्कृतिक आधार असायला हवा,तो तयारच झाला नसल्याचं लक्षात आलं. वय वर्षे पंधरा-सोळा ते वय वर्षे बावीस-तेवीस या वयोगटात यातलं काहीही येत नसेल तर मामला गंभीर आहे, हे पालकांना जाणवून देणं गरजेचं वाटलं. फक्त भरभक्कम गुणांच्या मार्कलिस्ट मिळवल्या आणि भरपूर पॅकेज मिळवलं म्हणजे आपलं आयुष्य परिपूर्ण झालं, असं होऊ शकत नाही, हे मुलं आणि पालक या दोघांनाही लक्षात यायला हवं....

बरं, शालेय अभ्यासात तरी उत्कृष्ट गुणवत्ता आहे का? तर पुष्कळदा तसंही नसतं. वर्षानुवर्षं मराठी ऐकून, वाचून, बोलून सुद्धा भेटलं, मिळालं, सापडलं यातला फरक कळत नाही. जर आणि अगर यातला फरक कळत नाही. मराठी बोलताना हिंदी इंग्रजी शब्द बेसुमार घुसवलेले असतात. देवनागरी लिखाणाबद्दल तर विचारायलाच नको. विज्ञानात पुस्तकी सर्किट डायग्राम येते, पण प्रत्यक्षात सर्किट तयार करता येत नाही. साधा सिलिंग मधला एलईडी बल्ब पण बदलता येत नाही. रात्री झोपण्यापूर्वी गॅस सिलेंडरचा नॉब बंद करता येत नाही. आखूड आणि तंग कपड्यांपेक्षा अंगभर शुद्ध सुती कपडे वापरण्याचं महत्त्व समजत नाही. जंक फूड मधला धोका लक्षात येत नाही. रोजच्या आयुष्यात प्लॅस्टिकचा वापर कसा टाळावा,हे कळत नाही. सिग्नलला थांबल्यावर दुचाकी बंद करावी, यातलं पर्यावरण महत्व कळत नाही. कापडी पिशवीचा वापर का वाढवायला हवा, हे समजत नाही. बाहेरून अन्न पार्सल आणायला जाताना सोबत स्टीलचा डबा घेऊन जावा, गरम पदार्थ प्लॅस्टिक कंटेनर किंवा फॉइल मधून पार्सल आणू नये, हे विज्ञान शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कळू नये? कृत्रिम शीतपेये कशी हानिकारक आहेत,हे कळत नाही. मग विज्ञानाचा नेमका अभ्यास ही मुलंमुली करतात तरी कशी? मग आयुष्य उत्तम जगण्यासाठीची सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक, भावनिक, शैक्षणिक, पर्यावरणविषयक, वैज्ञानिक, आर्थिक आणि राष्ट्रीय चारित्र्य विषयक जीवनदृष्टी आहे का? ते सर्वांगीण जीवनपोषण आपल्या मुलामुलींना कसं मिळणार, कुठून मिळणार, कोण देणार ह्याचा विचार आपण केला आहे का? हे प्रश्न इतके लख्ख समोर दिसल्यावर दोन महिन्यांपूर्वी आम्ही पालकांसाठी एक सत्र आयोजित **(पान ६ वर)**

---

## प्रांजळाचे आरसे

प्राचार्य डॉ.कृष्णा पोतदार
मो.९४२२८९५४६५



# भगवान बुद्धांचा उच्च-ध्येयतम जीवनमार्ग



आज बुद्ध पौर्णिमा! भगवान गौतम बुद्धांना मनःपूर्वक अभिवादन!! बुद्ध पौर्णिमेचं वैशिष्ट्य हे आहे की आजच्या दिवशी भगवान बुद्धांना ज्ञान-प्राप्ती झाली होती. या ज्ञानप्राप्तीत सर्वात महत्त्वाचे ज्ञान जर कुठले असेल तर ते म्हणजे दुःख मुक्तीचे.

नुकत्याच येऊन गेलेल्या वैश्विक महामारीने पुन्हा एकदा माणसाचा माज उतरवला आहे आणि हा धडा दिला आहे की मानवी जीवन अशाश्वत आहे; क्षणभंगुर आहे. त्यांनी निर्माण केलेला चंगळवाद काहीच कामाचा नाही. जगात शाश्वत आनंद निर्माण होण्याऐवजी दुःखाचा-वेदनेचा प्रकोप वाढीला लागला आहे. किंबहुना या दुःख-वेदनेमुळे जिवंतपणे माणसाला मरणप्राय यातना सोसाव्या लागत आहेत. त्याचं विज्ञान, त्याचा अनाठाई विकास आज भस्मासुरासारखा त्याच्यावरच उलटला आहे. त्राही माम् म्हणत सर्वजण आपल्या घराकडे, आपल्या गावाकडे पळत सुटले आहेत. आपल्याच घरात आपल्याला अत्यंत केविलवाण्या पद्धतीने लपवताहेत; आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करताहेत.

आता वेळ आली आहे समग्र चिंतनाची; जीवनाकडे नव्या दृष्टीने बघण्याची; खऱ्या अर्थाने ज्ञानप्राप्तीची. तथागत म्हणायचे तेच खरे आहे. यासाठी आपण भूत आणि भविष्यकाळाची स्वप्ने बघणे सोडून वर्तमानावर लक्ष देणं गरजेचे आहे. किंबहुना तोच सुखाचा मार्ग आहे. क्रोध हा आपल्यालातला सर्वात मोठा विकार आहे. आपल्याला त्याचीच शिक्षा भोगावी लागते. यासाठी कधीही क्रोधित होऊ नका. क्रोधित होण्याचा अर्थ आहे धगधगणारा कोळसा दुसऱ्याच्या अंगावर फेकणे पण त्यासाठी आधी आपल्या स्वतःला ही धग सहन करावी लागते. आपण नेहमी दुसऱ्यांवर संशय घेत असतो. आणि त्याचा प्रत्येक कृतीवर शंका घेत राहतो. त्यामुळे आपण एकमेकांपासून दूर जात राहतो आणि आपल्यातली मैत्री संपुष्टात येते. जगातील आपसी राष्ट्रांनी याच पद्धतीने आपली मैत्री संपुष्टात आणली आहे.

आपल्यातल्या अहंकारामुळे नेहमी आपण युद्धाची भाषा करतो. दुसऱ्यांवर विजय प्राप्त करण्याची कामना बाळगतो परंतु खरे युद्ध हे माणसाने स्वतःशी केले पाहिजे; आपल्या स्वतः वर विजय मिळवला पाहिजे. असे जर आपण केले तर नेहमी आपलाच विजय होत राहील. जीवनात सर्वात महत्त्वाचे जर काही असेल तर ते सत्य. सत्य कधीही लपून राहत नाही. सत्याला केव्हाना केव्हा सामोरे जावेच लागते. सत्याच्या मार्गावरून चालणारा मनुष्य फक्त दोन चुका करू शकतो. एक म्हणजे सत्याचा मार्ग तो पूर्णपणे चालू शकत नाही आणि दुसरे म्हणजे तो चालायला सुरुवातच करत नाही. ध्येय-प्राप्तीचे ही असेच काहीसे आहे. ते प्राप्त होण्यापेक्षा ध्येय-प्राप्तीचा प्रवास योग्य झाला पाहिजे. विश्वात मनुष्य प्राणीच एक असा आहे ज्याला वाचा प्राप्त झालेली आहे. त्याला बोलता येतं. बोलता येतं म्हणून काहीही बोलण्यात काहीच अर्थ नसतो. हजारो शब्द उच्चारण्यापेक्षा असा एकच शब्द उच्चारावा ज्याने शांती प्राप्त होईल. हेही लक्षात ठेवलं पाहिजे की विश्वातलं वाईट हे वाईटाने समाप्त होणार नाही. वाईट संपवायचं असेल तर ते प्रेमाने संपवता येऊ शकेल. आपण हे लक्षात घ्यायला हवं की एका पेटलेल्या दिव्याने हजारो दिवे प्रज्वलित होतात परंतु तरीही दिव्याचा प्रकाश कधीही कमी होत नाही. याप्रमाणे प्रसन्नता, आनंद आणि प्रेमाचं असंच काहीसे आहे ते वाटण्याने वाढत असतात; कधीही कमी होत नाहीत.

वैशाख पौर्णिमेला जन्मलेल्या महात्मा गौतम बुद्धाने बुद्धत्व प्राप्त झाल्यानंतर लोककल्याणार्थ उन्मुख केले होते. बुद्धाचा धम्म मध्यम मार्ग मानत होता. सुखोपभोग आणि शरीरदंडण या दोन्ही गोष्टी त्याने नाकारल्या होत्या. स्वतःवर विजय मिळवावा. कामतृष्णेपासून मुक्त व्हावे. सुखासक्ती अध:पतनाकडे नेते. जीवनाच्या स्वाभाविक गरजांची पूर्ती करणे वाईट नाही. या पूर्तीमुळे मलिन विकार निर्माण होणार नाहीत याची मात्र काळजी घ्यायला हवी; असे त्यांचे म्हणणे होते. भगवान बुद्ध म्हणतात शरीर निरोगी ठेवायला हवे. याशिवाय मन सुदृढ आणि स्वच्छ ठेवता येत नाही. प्रज्ञेचा दीपही प्रज्वलित ठेवता येत नाही. ईश्वर वा आत्म्याशी धम्माचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. कोणत्याही कर्मकांडाशी धम्माचा संबंध नाही. माणूस आणि माणसाचे माणसाशी असणारे या जगातील नाते हा धम्माचा मध्यवर्ती विषय आहे. माणूस हाच धम्माचा मुख्य मुद्दा आहे. माणूस दैन्य, दुःख आणि दारिद्र्यात राहत आहे. जगात दुःख आहे तेव्हा जगातून दुःख नाहीसे करणे हाच धम्माचा उद्देश आहे. माणसे जर पावित्र्य, सदाचरण आणि शील या मार्गांनी वागलीत तर जगातील दुःख नाहीसे होऊ शकते.

तथागतांचा धम्म म्हणजे काया, वाचा, मन निष्कलंक असणे हे जो शिकवतो तो धम्म होय. जीवहिंसा, चोरी, काममिथ्याचार, असत्य बोलणे या गोष्टी कामात बाधा आणतात. त्या टाळणे म्हणजे धम्म होय. निंदा करणे, कटू बोलणे, व्यर्थ बडबड करणे म्हणजे शिलाघात. यावर ताबा मिळवणे आवश्यक आहे. ज्याने ताबा मिळवला त्याला शील लाभ झाला असे म्हणता येते. माणसाच्या उज्वल जीवनासाठी बुद्धाने जी पंचशील सांगितलीत ती अतिशय महत्त्वाची आहेत. त्यात कोणत्याही प्राण्याला इजा न करणे, त्याची हिंसा न करणे, चोरी न करणे, व्याभिचार न करणे, असत्य न बोलणे, आणि मादक पेये न पिणे ही होत. तथागतांनी सदाचाराची मोठी आवश्यकता प्रतिपादन केली आहे. यासाठी अष्टांगिक मार्गाचा धम्माचार त्यांनी सांगितला. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मान्त, सम्यक आजीविका, सम्यक व्यायाम; सम्यक स्मृति आणि सम्यक समाधी. यासाठी शीलमार्ग महत्त्वाचा आहे. कारण शीलमार्ग म्हणजे सद्गुणांचा मार्ग आहे. त्यांनी दहा सदगुण सांगितले. हे दहा सदगुण म्हणजे दहा पारमिता होत. त्या अशा- शील, दान, उपेक्षा, नैष्कर्म्य, वीर्य, शांती, सत्य, अधिष्ठान, करुणा आणि मैत्री. या सदगुणांचा तथागतांनी ईश्वराशी वा मोक्षाशी कुठेही संबंध जोडला नाही. तथागत भगवान बुद्ध निब्बाण विचाराला महत्त्व देतात. निब्बाण विचारात प्राण्यांचे सुख, जिवंतपणी संसारात मिळणारे सुख आणि विकारांवर ताबा मिळवणे महत्त्वाचे असते. निब्बाण हा सामाजिक विचार आहे. सहजीवनाच्या सौंदर्याचा तो विचार आहे. सर्वच माणसांना उज्वल करणाऱ्या मानवी संबंधांचा तो विचार आहे. खुद्द बुद्ध तिच निब्बाण म्हणजे निर्दोष जीवन असे म्हटले आहे. अष्टांग मार्ग हा जीवन निर्दोष करणारा विचार आहे; त्यामुळे अष्टांग मार्गाचे पालन करणे म्हणजे निब्बाण ठरते. मृत्यू म्हणजे परिनिर्वाण होय तर मृत्यूपूर्वीचे उज्वल आणि निर्दोष जीवन म्हणजे निर्वाण किंवा निब्बाण होय. बुद्धांनी तृष्णेच्या त्यागाला धम्म असे म्हटले **(पान ६ वर)**

ऐका ते खरं
नितीन अहिरराव
मो.९०९६२०४८७५

# आवडतं एक गानं म्हना आनी दिनभर परसन्न ऱ्हावा..

रामराम हो मंडई रामराम, आजना ईसय बठ्ठास्लेच आवडी असाच शे , कारन माले संगीत आवडस नयी असा म्हननारा एकभी मानुस या जगमा कंदिल लीस्नी भी शोधा तरी सापडावं नयी. आनी ज्याले संगीत आवडस नयी तो म्हना मते मानुसच नयी . आनी मानुस काय मुका जित्राभस्ले भी संगीत आवडस हाई आपन देखतस, मंडई आपला भारतीय संस्कृतीमा संगीत आनी गानास्ले गहिरं महत्त्व शे . या संगीतनी आनी गानास्नी सुरुवात आपन जनमताच व्हई जास , आपला जनमाना पहिलेच व्हई अस म्हनं तरी हरकत नयी .

आपला जनम व्हताच आपन रडाले लागतस, तो आपला टह्याऽऽऽ टह्या ऽऽऽऽ ना आवाज ऐकीस्नी मायले आनन व्हस आनी ती आपुनले शांत कराना गुंता एक अंगाई गीत म्हनस , मायना लयबद्ध आवाज ऐकस्नी आपला जोगे आपली कायजी लेवाले कोनीतरी शे हाऊ भरोसा येस आनी टाया वाजाले लागी जातस , जिना यहॉ मरना यहॉ इसके सिवा जाना कहॉ हायी गानं ऐकताच आपन अंतर्मुख व्हई जातस , मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे मोती हायी गानं ऐकताच आपला मनमा देशप्रेमनी भावना जागृत व्हई जास . भारतरत्न लता मंगेशकर यास्नं ऐ मेरे वतन के लोगो ,जरा आँखं मे भरलो पानी जो शहिद हवे है उनकी जरा याद करो कुर्बानी हाई गान ऐकताच आपला भी डोया भरी येतसं .

मन वढाय वढाय उभा पिकातलं ढोर अरे संसार संसार जस तवा चुल्हावर ,आधी हाताले चटके मग मियते भाकर अरे रडता रडता डोये भरले भरले ,आसु सरले सरले आता हुंदके उरले ,आसु सरले सरले मले माझा विसावा ,असा आसवा बिगर रडु नको माझ्या जिवा या गानास्मा आपली बहिनाबाई चौधरी जिवननं तत्वज्ञान सांगी जास . दाटून कंठ येतो जा लाडके सुखाने या धीरगंभीर स्वर कानवर पडताच पोरले सासरले धाडनारा बापना डोया भरी येतस , आनी जिंदगी के सफर मे गुजर जाते है जो मकाम वो फिर नही आते हाई गान किशोर कुमार ना आवाजमा ऐकं ते आपुनले भी आपला सोबत व्हयेल परसंगनी याद ई जास आनी आपुनभी भुतकायमा चाल्ना जातस. मंडई हायी बठ्ठी गीत संगीतनीच ताकद शे की आपुन आपलं रडनं थांबस ,आपला भारतीय संस्कृतीमा असा एक भी परसंग नयी शे की त्यानावर गानं नयी शे अशी . कान टोचानं गानं , बारसानं गान, वाढदिवसन गान, लगननं गानं , होयीन गानं , रंगपंचमीन गानं , दिवायीन गानं, नवरात्रीनं गानं , गनपतीन गानं , पेरेमनं गानं , विरहनं गानं , देवना भक्तीनं गानं , आरती , पारायन, भागवत स्पतानं गानं , श्लोक, स्तोत्र , यात ते मेन मेन परसंग शेतस मंडई , अजून बराच परसंग शेतस त्याना भी गाना आपन मोठा आननथुन म्हनतस . एवढंच काय मानुस मरावर भी रातभर जागरन करीस्नी भजनी मंडयवाला भक्ती गीत म्हनतस आनी आते ते अमरधाम पावोत गाना म्हनानी पध्दत चालु व्हयेल शे . सांगाना उद्देश हाऊच की गाना , संगीत शिवाय आपलं जीवन पुरं व्होवुच शकत नयी . आपला जिवननं दुसर नावच गीत संगीत शे .मंडई आलपं कायीजना ज्या ठोका पडतस त्याले भी एक ताल शे , आनी हावु ताल जरा भी कमी जास्त व्हयीना ते आपलं जिवननं गनित बिघडु शकस ,

पहिले रामपाहिटामा गावमा वासुदेव गाना म्हनतं गाव जागाडाले ये , तो भुपायी नयी ते कृष्ण भक्तीना गाना म्हने आनी लोके त्याले दान देतं . जसा जसा काय बदलना तसा तसा वासुदेव गायब व्हई गयात, आते टेपरेकॉर्डर वर भक्ती गीते वाजतस. माध्यम बदलनं पन गीत संगीत ऐकानं बदलनं नयी . संगीतमा, गीतेस्ना शबदमा ईतली ताकद ऱ्हास की मानुस आपलं अस्तित्व ईसरीस्नी त्यानामा गुंग व्हई जास . झिंग झिंग झिंगाट हाई गान ऐकता बरोबर आपला पाय नकयत ठेका धरतस आनी आपुन नाचाले लागी जातस . गनपतीनी आरती सुरु व्हताच आपुन दोन्ही हातेवरी



हसता हसता रडाले आनी रडता रडता हासाले लागी जातस.

मंडई भारतीय शास्त्रीय संगीतनी शास्त्र शुध्द निर्मीती आपला ऋषीमुनी भरत मुनी यास्नी करेल शे , त्यास्नी आपला नाट्यशास्त्र या ग्रंथमा तपशीलवार बठ्ठा रागेस्नी माहिती लिखेल शे , कोनता राग कसा म्हनाना ,कव्हय म्हनाना, कोनता स्वरना उच्चार कसा कराना हायी बठ्ठी माहिती त्यास्ने आपुनले या ग्रंथमा सांगेल शे . सारंग देव यास्नी भी संगीतना अभ्यास कसा कराना या बद्दल आपला संगीत रत्नाकर आनी संगीत पारिजात या दोन ग्रंथेस्मा करेल शे . मंडई शास्त्रीय संगीत हायी एक दिर्घ साधना शे ती आपला जानता गुरुकडथुन शिष्यले शिखनी पडस . बादशहा अकबर ना दरबारात तानसेन नावना गायक व्हतात , या तानसेन नी ख्याती अशी होती की त्यास्नी जर राग मेघ मल्हार म्हनाले सुरुवात करी ते खरोखर पाऊस पडे आनी राग दिपक म्हनाले सुरुवात करी ते राज दरबारातना बठ्ठा दिवा आपोआप पेटी जायेत . मंडई आधुनिक विज्ञानही हायी सिध्द करेल शे की आपन जो भी शब्द उच्चारतस तो कोठेच जात नयी तो आठेच वातावरनमा ऱ्हास , या सिध्दांत नुसार भगवान श्रीकृष्ण नी जी गीता अर्जुनले युध्द भुमीमा सांगी ती संपूर्ण गीता जशीना तशी शोधाना प्रयत्न आपला शास्त्रज्ञ करी राहिनात.

शास्त्रीय संगीत शिकाडनारा गुरुस्ना घराना व्हतात , जसा आग्रा घराना, गाल्हेर घराना ,जयपूर घराना ,पतियाला घराना . या परतेक घरानानं एक खास अस वैशिष्ट्य व्हतं , स्वरेस्ना लय ताल म्हनानी खास पध्दत व्हती , आज भारतमा मोजकाच गुरू शेतस ज्यास्ले शास्त्रीय संगीतनं ज्ञान शे ,पन जास्ले खरोखर शास्त्रीय संगीत शिकानं शे त्या शिकी राहिनात आनी आपली परंपरा जपी राहिनात .मंडई आजपावोत लाख्खो , करोडो गाना बनना व्हतीन पन आजभी गाना लिखानी त्या गानास्ले संगीत देवानी आनी त्या गाना म्हनानी परंपरा अखंडपने चालु शे आनी ती अशीच चालु राहनार शे .मंडई जवय करमनुकना साधने उपलब्ध नव्हतात तवय गानासन्या मैफली रंगेत, ठुमरी गायन, ध्रुवपद गायन या गानाना परकार ऐकाले रसिक श्रोता रातभर जागेत आनी आपली मननी , काननी तृप्ती करी लेत . बालगंधर्व, मास्टर दीनानाथ मंगेशकर, मास्टर विनायक आनी असा बराच जेष्ठ श्रेष्ठ कलाकार रसिक श्रोतास्नं मनोरंजन करेत .

आपला संगीतमा परतेक वाद्यनी एक खास वयखं निर्मान करेल शे . ढोलकी आनी नालना टन ,टन टन टन ठेका ऐकताच आते लावनीले सुरुवात व्हयी हायी सांगी जास , तबलाना ढुमंपाक ढुपांक ढुम ठेका आनी टायेस्नी किनकिन ऐकताच आते भजन सुरु व्हयी हाई आपुनले माहित ऱ्हास . टायास्ना तालबद्ध ठेका कव्वालीनी याद करी जास . सारंगीना सुरु ऐकताच आते मुजरा गीत लागी हायी आपुनले समजी जास .आनी बासरीना मंत्रमुग्ध करनारा सुरु कानवर पडताच आते गवयनं नयी ते एखादं कृष्ण भक्तीगीत ऐकाले भेटी अस आपनं वयखी लेतस .

मंडई आपलं आवडत संगीत ऐकताच आपला मनले शांती मियस आनी आपलं मन परसन्न व्हई जास . संगीतनी हायी किमया देखीस्नी आधुनिक संगीत थेरेपी शास्त्रज्ञस्नी शोधी काढी , या थेरेपीमा काही विशिष्ट आजारी लोकेस्के संगीत ऐकाडीस्नी त्यास्नावर उपचार करतस आनी त्या आजारी लोके चांगलाभी व्हई जातस . गायत्री मंत्रमा इतली शक्ती शे की गायत्री मंत्र उच्चारन करताच आपल्या शरीरमातील असंख्य नसा प्रभावित व्हई जातीस, आपला शरीरमातील रक्त प्रवाह उत्तेजीत व्हई जास , रक्तमा ऑक्सिजन परमान वाढी जास आनी आपुनले एकदम ताजतवानं वाटाले लागी जास , परसन्न वाटाले लागी जास .मंडई गीत संगीतना माध्यमातून आपन आपल्या भावना व्यक्त करीस्नी समोरला व्यक्ती पावोत पोहचाडु शकतस आनी समोरला मानुसनी मनस्थिति काय शे हाई आपुनले माहिती पडस .चला मंग आपलं आवडत एक गानं म्हना आनी दिनभर परसन्न ऱ्हावा . भेटुत पुढला रविवारले तो पावोत बठ्ठा कान्हदेशी धनगोतले म्हना रामराम!

---

आरोग्यम् धनसंपदा

डॉ.रोहन कुलकर्णी
MBBS, MD Medicine, IDCCM²
कन्सल्टिंग फिजिशियन, इंटेंसिविस्ट
जवाहर एसीपीएम मेडिकल हॉस्पिटल,
साक्री रोड, धुळे. मो.९५०३४२०५१२



# उष्णतेचा झटका

## मधुमेह, रक्तदाब आणि हृदयासाठी धोक्याचा इशारा

भारतामध्ये उन्हाळा हा ऋतू केवळ उष्णताच घेऊन येत नाही, तर अनेक आरोग्यविषयक धोक्यांचे दार देखील उघडतो. एप्रिल ते जून या कालावधीत जेव्हा तापमान ४३ अंश सेल्सियसच्या पलीकडे जाते, तेव्हा क्शरीं थर्रीश किंवा उष्णतेची लाट अशी स्थिती उद्भवते. ही लाट केवळ अस्वस्थता नव्हे, तर अनेक गंभीर आजारांना निमंत्रण देणारी असते. विशेषतः मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि मेंदूज्वर यांसारख्या आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी ही वेळ अतिशय धोकादायक ठरू शकते.



उ ष ण त े म ु ळ े शरीराचे तापमान नियंत्रणातील यंत्रणा कोलमडते. सतत घाम येण्यामुळे शरीरातील पाणी आणि क्षार कमी होतात, ज्यामुळे डिहायड्रेशन होतो. त्यामुळे थकवा, चक्कर येणे, डोके गरगरणे यासारखी लक्षणे सुरू होतात. काही वेळा ही स्थिती Heat Stroke मध्ये रूपांतरित होते, जिथे शरीराचे तापमान 104AmoF पेक्षा अधिक वाढते. यामुळे रुग्णाला भ्रम, बेशुद्धपणा किंवा कोमा देखील येऊ शकतो. या अवस्थेत तत्काळ आयसीयू उपचारांची आवश्यकता असते. मधुमेह असणाऱ्या रुग्णांसाठी ही स्थिती आणखीनच गुंतागुंतीची होते. डिहायड्रेशनमुळे रक्तातील साखरेचे प्रमाण अचानक खाली किंवा वर जाऊ शकते. काही वेळा औषधांच्या प्रभावातही फरक पडतो. उच्च रक्तदाब असणाऱ्या रुग्णांमध्ये देखील रक्तदाब कमी होण्याची शक्यता वाढते. अशावेळी चक्कर येणे, थकवा जाणवणे, किंवा अचानक बेशुद्ध होणे यांसारख्या घटनाही घडतात.

हृदयविकार असलेल्या रुग्णांना उष्णता अजूनच धोका निर्माण करते. शरीराचे तापमान वाढल्यामुळे हृदयावर अतिरिक्त ताण येतो. परिणामी छातीत दुखणे, धाप लागणे किंवा अनियमित हृदयगती अशा समस्या निर्माण होऊ शकतात. अशा परिस्थितीत वेळ न घालवता डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असते. उष्णतेचा आणखी एक मोठा धोका म्हणजे इम्युनिटी (प्रतिकारशक्ती) कमी होणे. यामुळे डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरिया यांसारखे ताप येण्याची शक्यता वाढते. लहान मुलांमध्ये मेंदूज्वर (encephalitis) सारख्या आजारांचीही शक्यता असते. हे ताप खूप वेगाने वाढत असल्याने, यामध्ये उलट्या, मांड्या आखडणे, झोपेचा अती त्रास यांसारखी लक्षणे दिसू लागतात.

या धोक्यांपासून बचाव करण्यासाठी काही सोपे उपाय महत्त्वाचे ठरतात. सर्वप्रथम, शरीरातील पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी दिवसात किमान ८ ते १० ग्लास पाणी पिणे गरजेचे आहे. जठड, लिंबूपाणी, ताक, नारळपाणी यांचा वापर करून इलेक्ट्रोलाइट्सची पातळी योग्य ठेवावी. दुपारी ११ ते ५ या वेळेत शक्यतो बाहेर पडणे टाळावे. पांढऱ्या, सैलसर आणि सुताच्या कपड्यांचा वापर करावा. डोकं झाकून ठेवावं – टोपी किंवा छत्रीचा वापर अत्यंत उपयुक्त ठरतो. थंड व पाण्याची मात्रा असलेले पदार्थ जसे की फळांचा रस, काकडी, कलिंगड यांचा आहारात समावेश करावा. जर कुणाला सतत ताप येत असेल, उलट्या, बेशुद्धावस्था, छातीत दुखणे किंवा श्वास घ्यायला त्रास होत असेल, तर वेळ न घालवता जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. विशेषतः ज्यांना आधीच मधुमेह, बीपी किंवा हृदयरोग आहे, त्यांच्यासाठी उष्णतेची लाट अधिक घातक ठरू शकते.

उष्णतेच्या या काळात शरीराची काळजी घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. योग्य खबरदारी, समतोल आहार आणि वेळेवर उपचार यामुळे आपण उष्णतेच्या या संकटातून सुरक्षित राहू शकतो.

---

# निरोगी रहायचे असेल तर नि:स्वार्थ नाते जपा!

मला कशाची अपेक्षा नाही हे वाक्यच मुळात चूक आहे . माणसं देवासमोर रुपया ठेवून लगेच खडीसाखर घ्यायला हात पुढे करतात . त्यामुळे अपेक्षा नाही असा माणूस या जगात नाही . अपेक्षा करत असताना मात्र समोरचा माणूस ती पूर्ण करू शकतो का याची मात्र खात्री करावी . आपली जशी पाच बोटं तुपात नसतात तशीच समोरच्या माणसाची सुद्धा नसतात . कमी प्रत्येकाला आहे .. कोणाला पैशाची आहे , कोणाला जागेची आहे , कोणाला भावनांची आहे , कोणाला शारीरिक ताकदीची आहे , कोणाला मनुष्य बळाची आहे , कोणाला प्रेमाची आहे वगैरे .. समोरच्या कडे भरपूर आहे या मानसिकतेतून आधी बाहेर पडा



.भरपूर असणाऱ्याला खर्च सुद्धा भरपूर असतात . त्याच्या गरजा असतात , प्रपंच असतो , अडचणी असतात .. त्या सोडवायला आपण असतो का ? ज्या झाडाला आपण खत पाणी घातलेच नाही , त्या झाडाची फक्त फळे आपल्याला मिळावी म्हणून अपेक्षा का बाळगायची ? दुःख आणि अपेक्षाभंग इथेच होते ! निरोगी राहायचे असेल तर निःस्वार्थ नाती जपा! माझी एकच अपेक्षा आहे बाबा , समोर याल तेव्हा चार शब्द गोड बोला ! ही एकमेव अपेक्षा ठेवा ... डिप्रेशन ची गोळी मागे लागत नाही !!

–वैद्य अंकुर रविकांत देशपांडे
एम डी (आयुर्वेद )
आरोग्य मंदीर (सांगली – पुणे )
७२७६३३८५८५

---

हास्यगिरी
प्रा.वसंत गिरी
मो.९०११२२९२३२

# विनोदी काव्यनिर्मिती साहित्यातील आनंदानुभूती

बाबासाहेब पुरंदरें लीलाताई पटवर्धनांशी विवाहबद्ध झाले.त्याप्रसंगी नवदाम्त्यास काव्यरूप आहेर करण्याचीअविस्मरणीय व उत्फूर्त कल्पना अत्र्यांच्या डोक्यात आली नसती तरच नवल. मिलनोत्सुक नवदाम्पत्याच्या मनातील परस्पर आतुरतेला छेद देणारा दीर्घ विवाहविधी त्यात होणारा अतिविलंब याचे अत्र्यांनी अत्यंत मिश्कील व भावप्रधान वर्णन करुन शेवटी संसारीक जीवना विषयी योग्य मार्गदर्शन केले.आपण मनसोक्त, स्वच्छंदी जगू नये यासाठी नको ते नितीनियम सांगून आपले जीवन रसहिन करण्याची शक्ती आपल्या पारंपारिक विचारसरणीत मोठ्या प्रमाणात आहे. पण त्याला छेद देऊन स्वच्छंदी जीवन नवदांपत्याने कसे जगावे?या प्रश्नाचे उत्तर त्यांनी आपल्या विनोदी काव्यशैलीत दिले.

आनंदाची व सर्व सुखाची जीवित ही खाण।
हसेल आणि जगेल त्यास नच कसली वाण ।

हा कलंदर जगण्याचा मंत्र आ.अत्रे उर्फ केशव कुमारांनी दिला आहे. आणि सांगतो अखेर एकच,भांडणतंटा जरि झाला कधि तरि तो घ्यावा प्रेमाने मिटता । आरंभी येतिल गेली की काय?अशी शंका प्रेमवीराच्या मनात निर्माण होते.त्यावर प्रेयसी म्हणाली,छे.. छे...एक पाकळी सुद्धा वाया गेली नाही. एवढे बोलून ती स्वंयपाक घरातून एक बरणी घेऊन आली आणि म्हणाली,पहा मी त्या प्रेमाचा गुलकंद केला. तो गुलकंद पाहून त्याला प्रेमभंगाचा संकेत मिळाला.त्याच्या छातीत येणारी कळं तर ईहलोकाची यात्रा संपण्याचे संकेत देवू लागली.त्याने त्वरित बरणी हस्तगत केली व मनातल्या मनात म्हणाला, तू नही तो तेरा गुलकंद सही.थोडा थोडा मुह मिठा कर लुंगा.कडवे दिलको शायद थोडीसी ठंडक मिल जाएगी और बस्स जी लूंगा,बाकी रखखाही क्या है इसं विरानं जिदगीमे । असा विचार करुन स्वगृही परतला. त्यानंतर गुलकंद संपेपर्यंत ' 'दिलमन दिलमन 'असा जप करण्याऐवजी 'गुलकंद गुलकंद'असेच तो गुणगुणत होता.' प्रेमाचा गुलकंद 'ह्या कवितेत या सर्व घटनेचे सर्वांगसुंदर वर्णन केले आहे.

ना ग लिमयेंची ' वल्लवदूत 'ही एक विनोदी कविता,कवितेतील नायक एक महाविद्यालयीन विवाहीत युवक आहे.त्याच्या सहचारीणीसवे प्रणय करण्यात तो वेळ घालवून एकाच वर्गाचा पाया पक्का करतो. त्याला परिक्षेत यश मिळावे यासाठी त्याचे पिताश्री त्याची मुंबईवरुन पुण्याच्या महाविद्यालयात रवानगी करतात. सुटीतही मुंबईला येण्यास बंदी घालून एका अर्थाने आपल्या मुलास तडीपार शिक्षाच देवून दोन जीवाच्या पराकोटीच्या विरहवेदना वाढवून,ओ खुद प्यार के जानी दुश्मन बन जाते है । त्यामुळे त्या नरोबाची अवस्था अशी होते. त्याचा होई मुखडाही फिका,बैसले गाल साफ ।हाता–अडथळे! जो वरी न हलला,सदनि पाळणा–––

नवदाम्पत्यासाठी एक विनोदी कविता करुन केशवकुमारांनी अगदीच धमाल उडवून दिली.शिवाय विवाह प्रसंगी अशा कवितांचे वाचन,मंगलाष्टकाच्या चालिवर गायन हा सर्व उपस्थितांसाठी एक सुखद अनुभव होता. तत्कालिन ज. के. उपाध्ये यांची मूळ प्रवृती गंभिर काव्यनिर्मितीची,पण त्यांनी काही अंशी विनोदी काव्यनिर्मितीचा यशस्वी प्रयोग केला. कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णांनी आत्मविश्वास गमावून भाव विवश झालेल्या अर्जुनास गितोपदेश केला.तो अगदी ग्राम्य भाषेतून,त्यातून जी विनोदनिर्मिती झाली.ती वाचून वाचकांचे भन्नाट मनोरंजन त्यावेळी झाले. आजही झाल्याशिवाय राहणार नाही.त्या कवितेतील काही भागाचा इथे आपण आस्वाद घेत आहोत.

पार्थ म्हणे ऋषिकेशी । या युद्धाची ऐशीतैशी । बेहत्तर आहे मेलो उपाशी । पण लढणार नाही समोर सारेच बेटे जावाई । बाप,दादे आन् काके ।

त्यांच्यासोबत लढू कसा?त्यांना मारू कसा? लढाई असते का सोपी ? मारे चालती कापाकापी । कित्येक लेकाचे संतापी । मुंडकेही छाटती ।। बायका बोंबलती घरी । डोई जोडून करितो खापरी चालं चालं कृष्णा माघारी। सोड पिच्छा युद्धाचा ।।अर्जुनाचा असा अवसानघातकीपणा पाहून कृष्णाला भंयकर संताप आला. त्या संतापाच्या भरात त्यांनी अर्जुनाला पुढील शब्दात तंबी दिली. कृष्ण म्हणे अर्जुना । हा कोठला बायलेपणा ।पहिल्याने तर टणाटणा । उडत होतास लढाया ।। मारे रथावरी बैसला । शंखध्वनी काय केला । तू बेट्या मूळचाच ढिला । पूर्वीपासून जाणतो तुला ।परि आता तुझ्या बापाला सोडणार नाही बच्चमजी ।।

अर्जुनातील साहस जागे करण्यासाठी कृष्ण पुढे क्रोधित होऊन म्हणतात. अहाऽहाऽरे... ! भागूबाई । म्हणे मी लढणार नाही ।बांगड्या भरा की रडूबाई । मग बसा दळत काही ।।कृष्ण अर्जुनातील रणवीर जागा करण्यासाठी त्याला खूप अपमानास्पद बोलतो पण अर्जुन बर्फाच्या गोळ्यासारखा थंडगार आहे.तो पुढे म्हणतो:– अर्जुन म्हणे जा हरी । आता कटकट पुरे करी दहादा सांगीतले तरी । हेका तू असा करी?।। तरी अर्जुनात काहीच बदल नाही.तो तटस्थ आहे. तो जागचा हलायला तयार नाही. ऐसे बोलून अर्जुन । दुर फेकी धनुष्यबाण । खेटरावाणी तोंड करुन । मटकन खाली बैसला ।। अशी बोलीभाषेतील उपाध्येंची कविता मराठी काव्य प्रांतातील उत्तम कविता म्हणून गणल्या गेली.अशा अटीतटीच्या प्रसंगावर विनोदी काव्य प्रसविणे शक्य आहे.हे ज्या कालावधीत विनोदी काव्यास साहित्यात फारसे स्थान नसतांना उपाध्येंनी केलेले धाडस लोक प्रिय झाले.अर्थात विसाव्या शतकातील कृष्ण आणि अर्जुन नावाचे व्यक्ती डोळ्यासमोर ठेऊनच त्यांनी ही रचना केली असावी यात संदेह नाही. एक दिवाणा आपल्या प्रेयसीवरील प्रेम सिद्ध करण्या साठी दररोज एक गुलाबपुष्प तिला देतो.कित्येक दिवस त्याचा हा अखंडित उपक्रम नेटाने सुरुअसतो. आपल्या तपस्येला कधीतरी फळ येईलच.हा आशा– वाद त्याच्या जगण्याला बळ देतो.पण शैवटी फल– निष्पती काय?निश्चय पक्का करुन तो एकदा तिला म्हणाला, मी एवढ्या दिवसापासून तुझी मनोमन पूजा करतोय.माझ्या मनातील प्रेम तुला कळत नाही का?माझी सर्व गुलाबपुष्प वाया तून हळूहळू गळू लागले रिस्टवॉच । यावरुन त्याच्या विरहवेदना किती असह्य असाव्यात याची कल्पना वाचकांना येते.आपले वडील शिस्तीच्या नावाखाली आपला छळ करताहेत.ही त्याची मानसिकता तयार होतै. त्याने विद्यार्थ्याचे जेवण तयार करणाऱ्या आचाऱ्यास ( वल्हवास ) सांगितले. सुटीच्या दिवसातही आपला निर्दयी बाप घरी येवू देत नाही.आपल्या शिवाय विरहात जगत असलेल्या आपल्या पत्नीचा चेहरा त्याच्या दृष्टीसमोर वारंवार येत असतो.पुण्यावरुन मुंबईला माझ्या पत्नीचा शोध घेत कसा जाशीलं?हे सर्व अडचणीवर मात करुन तू माझे कुशल मंगल सांगण्यासाठी काय काय द्रविडी प्राणायाम करशील हे तो त्या आचाऱ्यास सांगतो. ते वर्णन वाचल्यावर वाचकांचे भरपूर मनोरंजन होते. आपले काम पूर्ण झाल्यावर तो वल्लवाचे ऋण व्यक्त करतो आणि त्याला शुभेच्छा देवून म्हणतो. माझे झाल्यावरती सगळे कार्य,जा आत्मकार्या ।लाखो लग्नी तुजसी जिलब्या,लाडू मिळोत खाया । जे जे वाटे रुचिर तुजला,खाद्य ते तेच भोग । होवो ऐसा न तुज मदिरा–भांग–गांजा–वियोग ।। ना ग लिमये यांची ही विनोदी कविता ' वल्लवदूत ' खूप वाचकांना काव्यानंद देऊन गेली.

जे न देखे रवी ते देखे कवी 'अशी कविंची महती सांगीतली जाते.कविंच्या संदर्भाने केलेलाअति उच्च– तम वरील विचार आठवला की कविंची अपार महती अंत:करणात निर्माण होते.पण संसारिक जीवनातील अत्यावश्यक दैनंदिन गरजा पूर्ण करण्याऐवजी आकाशातील चंद्रतारे आणून देण्याची भाषा करणारे कविराज बाजारातून आपल्या सहचारीणीला एक झाडू पटकन आणून देत नाहीत.ही त्या माऊलीची व्यथा.पत्नीच्या मागे फिरतांना मात्र सारखे ' प्रिये ' 'सुंदरी' म्हणून तिला कर्णबधीर करुन टाकतो. हे शब्दही नेहमीच उच्चारले जातअसतीलं तर,विटले ग बाई कानं माझे,फाटले पडदे कानाचे । ही तिची मनस्थिती होणे अगदी साहजिक आहे. कविराज पती रात्री दिवा सतत सुरु ठेवतो.रात्री, बेरात्री कविता करीत बसतो आणि मग कवितेला चालं देण्यासाठी मध्येच कुत्र्यासारखे इवळतो.याच्याशी लग्न करुन माझ्या झोपेचे खोबरे झालेच,पण आयुष्याची माती झाली. अशाप्रकारे कविच्या पत्नीची व्यथा मांडली आहे.कविराज वा गो मायदेवांनी.' फसले ग बाई ! ' या कवितेत.कदाचित त्यांना स्वानुभव मांडण्याची उपरती झाली असावी. त्यांचे ते सत्य अनुभव कथन असेलं तर त्यांना शत शत बार धन्यवाद देऊन त्यांनी जी उत्कृष्ठ विनोदी काव्यनिर्मिती केली,त्याची दखल घेणे गरजेचे आहे.त्यासोबतच ' हिला पाहिजे ग आय.सी.एस.' या कवितेत मुलिंना मोठ्या पदावरचा व गडगंज पैसा कमावणारा नवरा हवा असतो. ही काही महत्वाकांक्षी मुलींच्या मनातीलं हव्यासी वृती वा गो मायदेवांनी संबधीत कवितेत स्पष्ट केली आणि त्यातून विनोद निर्मिती साध्य केली. यावरुन प्रत्येक वाङप्रकारात विनोदनिर्मिती करता येते.त्याला विषयाचे बंधन नाही. निखळआनंद लुटणे हा आनंदाचा विषय असला पाहिजे.हे मात्र खूप महत्वाचे.मुद्यावरुन गुद्यावर येणे हा हेतू साहित्य निर्मितीत येत असेलं तर एका वेगळ्या विनोदाचा तिथे आरंभ होतं असतो.अलिकडे ही प्रवृती साहित्य क्षेत्रात वाढत असल्यामुळे एक वेगळे विनोदविश्व अनुभवास येतं आहे.जे सरळमार्गी साहित्यिकाला अस्वस्थ करणारे आहे.

---

प्रतिबिंब

### लेख वाचून अंतर्मन प्रसन्न झाले

दैनिक आपला महाराष्ट्र मधील हास्यगिरी सदरातील विनोदाने अहंकार व विकृतीचा नाश व्हावा हा लेख वाचून अंतर्मन प्रसन्न झाले. समाजातील विसंगती, अहंकार आणि विकृतींवर मार्मिक भाष्य करतानाच श्री गिरी यांनी विनोदाच्या माध्यमातून चिंतनाची वाट उघडली आहे. त्यांचे लेखन केवळ हसवणारे नाही, तर अंतर्मुख करणारे आहे. सहज भाषाशैली, व्यंग्यात्मक ओघ आणि सकारात्मक संदेश यामुळे हे लेखन वाचकांच्या मनात घर करते. अशा संवेदनशील आणि सृजनशील लेखकाला मनःपूर्वक सलाम!

**–दिलीप राजाराम कुळकर्णी, नाशिक**

### विचार प्रवृत्त करणारा लेख

प्राध्यापक वसंत गिरी यांचा विनोदाने अहंकार व विकृतीचा नाश व्हावा हा लेख अत्यंत प्रभावी आणि विचारप्रवृत्त करणारा आहे. लेखातील विनोद हा केवळ हसवण्यासाठी नाही, तर समाजातील ढोंगी वृत्ती, व्यसनाधीनता आणि व्यक्तीगत व सामाजिक मुखवटे यांच्यावर तीव्र उपहासात्मक बोट ठेवणारा आहे. मक्या–पक्या यांच्यातील संवाद, अनुभव आणि कथनाच्या शैलीतून लेखकाने मानवी स्वभावातील विसंगती, खोटं अभिमान, आणि तथाकथित सभ्यतेचं पोकळ आवरण उघडं पाडलं आहे. प्रकृती चांगली ठेवण्यासाठी फारसा पैसा लागत नाही, पण ती बिघडविण्यासाठी खूप काही करावं लागतं ही ओळ केवळ वैयक्तिक आरोग्याबद्दलच नव्हे, तर संपूर्ण जीवनशैलीबद्दल एक सूक्ष्म भाष्य करते. हा लेख आपल्याला हसवतो, पण त्याचवेळी अंतर्मुखही करतो; तो विनोदाच्या आडून सजगतेचा आवाज उठवतो. वास्तवावर केलेलं हे भाष्य इतकं तीव्र आहे की ते नकळत आपल्यालाच आरसा दाखवतं. त्यामुळे, हा लेख केवळ विनोदी नसून, सामाजिक प्रबोधनाचं एक प्रभावी माध्यम ठरतो.

**–प्राचार्य डॉ बालाजी लाहोरकर**
श्रीमती सिंधुताई जाधव कला विज्ञान महाविद्यालय मेहकर जिल्हा बुलढाणा

## खान्देश वैभव

प्राचार्य डॉ.अनिल बैसाणे
मो.९८२३२७७६१२
प्राचार्य डॉ.सुभाष पाटील
मो.९४२२२१८९९९

# थोर गांधीवादी भिल्ल समाजसेवक नानासाहेब श्री. शंकर विनायक ठकार

थोर गांधीवादी आणि भिल्ल समाजसेवक म्हणून लोकप्रिय असलेले नानासाहेब श्री. शंकर विनायक ठकार यांचा जन्म २५ सप्टेबर १८९३ रोजी धारवाड येथे झाला. प्रारंभीचे शालेय शिक्षण हे धारवाड येथे तर पुणे येथील नूतन मराठी विद्यालयातून ते मॅट्रीक झालेत. पुणे येथूनच फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी बी. ए. ची पदवी संपादन केली. समाजसेवेची आवड असलेल्या नानासाहेबांनी अहिल्यानगर येथे अनाथ विद्यार्थी गृहात काही दिवस सेवाशुश्रूषाचे कार्य केले. पुढे पुणे येथील नूतन मराठी विद्यालयात शिक्षकाची नोकरी पत्करली. याच काळात २२ फेब्रुवारी १९२० रोजी विष्णूपंत आणि सौ. भागिरथीबाई पोतदार यांची कन्या यमुनाबाई म्हणजेच पार्वतीबाईंशी विवाह झाला.

**खानदेश कर्मभूमी :**

ब्रिटिश शासनाच्या अनुदानातून मिळणार्या पगाराची नोकरी नको असलेल्या नानासाहेबांनी पुणे येथील शिक्षक पदाचा राजीनामा देवून अमळनेर येथील राष्ट्रीय विद्यालयात नोकरी पत्करली. पुण्याहून घरसंसाराचे मोजकेच साहित्य बैलगाडीने अमळनेरला आणले. येथेच श्री. काणे, श्री. गोखले, स्वामी कुवलयानंद, आपटे गुरुजी या शिक्षक बांधवांसह नंतर आलेल्या पूज्य सानेगुरुजी यांचा सहवास लाभला. लोकाग्रहास्तव अमळनेर नगरपालिकेची निवडणूक लढविली. कुठलाही प्रचार व आर्थिक खर्च न करु देता लोकांनीच त्यांना निवडून आणले. खानदेशच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय वाटचालीत अग्रणी राहिलेल्या नानासाहेब ठकार यांची खानदेश हीच कर्मभूमी राहिली.

**'खानदेश जिल्हा मंडळा'ची स्थापना :**

अनुदानाशिवाय शाळा चालविणे कठीण झाल्याने नानासाहेब कार्यरत असलेल्या अमळनेरच्या राष्ट्रीय विद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळानेही सन १९२३ मध्ये अनुदान घेण्याचा निर्णय घेतला. मात्र अनुदानीत शाळेत नोकरी न करण्याचे ध्येयच नानासाहेबांनी स्वीकारलेले होते. तेव्हां अमळनेरची शाळा सोडल्यास पुढे काय ? अशा विवंचनेत असतांनाच नानासाहेबांना धुळ्याचे बोलविणे आले. कारण पश्चिम खानदेश जिल्ह्याला पूर्णवेळ प्रचार कार्य करणारा प्रचारक हवा होता. म्हणून नानासाहेबांनी अमळनेर सोडून धुळे येथे बिर्हाड आणले. धुळे येथे पश्चिम खानदेश जिल्हा मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाचे कार्य लोकसहभाग आणि लोकवर्गणीतून चालत असे. नानासाहेबांना निर्वाह वेतन म्हणून पन्नास रुपये महिना देण्याचे ठरले. ग्रामसेवेची आवड असलेल्या नानासाहेब ठकार यांनी खेड्यापाड्यात प्रचार आणि जनजागृतीच्या कार्यास वाहून घेतले.

**लो. टिळक आणि म. गांधीजींचा आशीर्वाद :**

नानासाहेब यांना विद्यार्थी जीवनापासूनच देशसेवेची आस लागून होती. स्वदेशी व देशाभिमान बाळगणार्या लो. टिळकांचा आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर होता. सन १९१६ मध्ये लो. टिळक परदेशात जाण्याकरिता निघाले होते तेव्हा मोठ्या हिमतीने नानासाहेब ठकार यांनी मुंबई येथील सरदार गृहात भेट घेवून ग्रामसुधार योजनेचा आराखडाच लो. टिळकांना सूपूर्द केला होता. यावर लो. टिळक म्हणाले होते की, ''योजना उत्तम आहे, पण हे सर्व काम करणार कोण ?'' अशी विचारणा केली होती. यावर नानासाहेबांना काही व्यक्त करता आले नसले तरी ही जबाबदारी आपणच स्वीकारावी असाच लो. टिळकांचा निर्देश होता. लो. टिळकांच्या या आशीर्वादाचे स्मरण ठेवून नानासाहेब समाजसेवी व्रतस्थ बनले.

पुढील काळात नानासाहेबांनी पत्नी पार्वतीबाई, मुलगी तारामतीसह बाळूभाई मेहतांसह गांधीजींची भेट घेतली. त्यावेळी देशभर फिरुन खादी केंद्रांना भेटी देवून कामकाज पाहण्याचा सल्ला गांधीजींनी दिला होता. म्हणून ठकार दाम्पत्याने आपली कन्या तारामतीसह बेळगाव, मदुरा, तिरुपती, त्रिवेंद्रम, जगन्नाथपुरी, कलकत्ता, बंगाल, पाटणा, जयपूर अशा स्थळांचा चार महिन्यांचा दौरा केला. आणि साबरमतीला परत आलेत. येथे माता कस्तुरबांच्या हातचे भोजन घेवून त्यांना धन्यता वाटली. याप्रसंगी म. गांधीजींनी सुचना केली होती की, 'तुमच्या जिल्ह्यातील आवडीचे खेडे निवडून ते स्वावलंबी बनवा.' गांधीजींचा हा निर्देश आपल्याला कार्यप्रवणतेचा आशीर्वादच होता म्हणून नानासाहेब व पार्वतीबाई मोठ्या उमेदीने धुळे येथे परत आलेत.

**ग्रामसेवा केंद्राकरीता सवाई मुकटीची निवड:**

धुळे येथे आलेल्या नानासाहेब ठकार यांनी संपूर्ण पश्चिम खानदेशचा दौरा हाती घेतला. जिल्हा मंडळाचे अध्यक्ष श्री. शंकर श्रीकृष्ण उर्फ नानासाहेब देव, चिटणीस श्री. विनायक नरहर उर्फ काकासाहेब बर्वे यांचा विश्वास आणि पाठबळ होतेच. याकाळात ठकार दाम्पत्याचा शिंदखेडा येथे मुक्काम होता. नानासाहेबांनी सर्वत्र फिरत गावांची पाहणी केली. खेड्यापाड्यात रात्रीच्या सभा घेवून ते लोकसंवाद साधत. कथा-किर्तने, विवाह समारंभ, कारण-बारावे अशा कोणत्याही प्रसंगी संधी साधून ते लोकांशी हितगुज साधत. एका प्रसंगात तर तमाशाच्या मंचावरुन सुद्धा देशसेवेचा संदेश दिला होता. अशा तर्हेने पश्चिम खानदेशातून १५० / १७५ खेड्यांचा सर्वे त्यांनी केला. धुळे शहराच्या वायव्येस आठ कोस अंतरावर असलेले शिंदखेडा तालुक्यातील सवाई मुकटी हे गाव आपल्या कार्याकरिता त्यांना योग्य वाटले. म्हणून येथेच ग्रामसेवा केंद्र सुरु करण्याचे निश्चित केले.

**'समर्थ उद्योग मंदिरा'ची स्थापना :**

हिंदू-मुस्लिम धर्मीय आणि सर्व जाती-पोटजाती, उपजातींचे लोक येथे सहृदयतेने वास्तव्यास होते. येथे वारकरी



संप्रादायाची रुजवण झाली होती. सदर गावात सात्वीक व भाविकपणाच्या वाढीस वाव होता. म्हणून ठकार दाम्पत्यांनी सवाई मुकटी येथे सन १९२८ मध्ये श्रीराम नवमीच्या शुभमूहूर्तावर ग्रामसेवा कार्याची सुरुवात केली. त्याकरिता 'समर्थ उद्योग मंदिरा'ची स्थापना केली. सुरुवातीला गावातील भजनी मंडळाला हाताशी धरुन 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' असल्याचे पटवून दिले. नानासाहेबांच्या कार्याचे महत्त्व कळाल्यावर गावकर्यांनी पुढे गावचावडीची प्रशस्त जागा उद्योग मंदिराकरिता उपलब्ध करुन दिली. गावकर्यांचा उर्स्फूत सहभाग वाढल्याने १५ चरखे, ३ ते ४ माग कार्यरत झालेत.

ज्यांचे शाळेत जाण्याचे वय निघून गेले अशांकरिता रात्रीची शाळा सुरु करुन साक्षरतेची मोहीम राबविण्यात आली. या शाळेत सर्वच जाती-पातींची ३० ते ४० माणसे येत असत. या उद्योग मंदिरातील शाळेत स्वत: नानासाहेब शिकवित. नानासाहेबांनी लोकांचा वाढता उत्साह आणि प्रतिसाद लक्षात घेता सवाई मुकटीला भव्य सम्मेलन भरविले. या सम्मेलनाला आजू-बाजूच्या खेड्यापाड्यातून बैलगाडीने येवून लोकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. सरकी काढणे, पिंजणे, पेळू तयार करणे, सूत काढणे व कापड विणणे असे उद्योगशील कार्यक्रम या सम्मेलनात राबविण्यात आले होते. याप्रसंगी पूज्य विनोबाजींचे उत्स्फूर्तपणे भाषण झाले होते. एक खेडे स्वयंपूर्ण बनले म्हणजे इतर गावेही तो आदर्श बाळगतील असा गांधीजींचा आत्मविश्वास फलद्रूप झाल्याचे हे द्योतकच होते.

महत्त्वाचे म्हणजे या केंद्रामार्फत स्वावलंबनाबरोबरच अनेक मानवतावादी उपक्रम राबविले जात. यात्रेतील बेकायदेशीर दारु विक्री पोलीसांच्या सहकार्याने बंद केलीत. महिलांकरिता तट्ट्यांचे बंद संडास योजना, सार्वजनिक उत्सवातून एकात्मता अशा अनेकविध उपक्रमातून ग्रामसेवेचे व्रतस्थ जीवन ठकार दाम्पत्यांनी प्रवाहीत केले होते.

**केळपाडा भिल्ल वस्तीत वास्तव्य :**

खानदेशात एकूण लोकसंख्येच्या एक तृतीयांश एवढी संख्या आदिवासी समूहाची होती. त्यांच्यात आरोग्य व शिक्षणाच्या सुविधांचा अभाव होता. म्हणून नानासाहेबांनी ठक्करबाप्पा आणि श्रीकांत शेठ यांच्या भेटी घेवून आदिवासी बांधवांच्या सेवेचा निर्णय घेतला. काशिनाथभाई वैद्य यांना सोबत घेवून ठकार दाम्पत्याने चिंचपाडा ता. नवापूर जवळील केळपाडा येथेच वास्तव्य केले. काशिनाथ वैद्य यांच्या मार्फत ताप, खोकला सारख्या रोगांवर औषधोपचार केला जाई. तर ठकार दाम्पत्यांकडून ग्रामसेवेच्या कार्यातून जाणिवा निर्माण केल्या जात. श्री. वैद्य व श्री. ठकार हे आपल्या परिवारासह येथे वास्तव्यास होते. नानासाहेबांनी तर मुलगा राजा (विनायक) यास येथेच बोर्डाच्या शाळेत दाखल केले होते.

**'भिल्ल सेवा मंडळा'ची स्थापना :**

केळपाड्याच्या भिल्ल ग्रामसेवा कार्याचे निष्पन्न पाहता या कार्याची व्यापकता वाढविणे आवश्यक वाटू लागले. म्हणून नंदुरबार येथे श्री. त्रिकमभाई सराफ यांच्या अध्यक्षतेखाली 'भिल्ल सेवा मंडळा'ची स्थापना करण्यात आली. या संस्थेचे उद्घाटन पूज्य ठक्करबाप्पा यांच्या हस्ते करण्यात आले. आदिवासी भागात शाळा काढून शिक्षण प्रसार आणि ग्रामसेवेच्या माध्यमातून आदिवासींमध्ये आत्मभान जागृत करण्याचे कार्य हाती घेतले. तळोदा येथे आदिवासी मुलींकरिता 'शबरी कन्या मंदिर' सुरु करण्यात आले. येथील मीरा नावाच्या भिल्ल समुदायाच्या मुलीस सासवड, पुणे येथील प्रेमाबाई कंटक यांच्या संस्थेत पाठविण्यात आले. या मुलीने ग्रामसेविका म्हणून कार्यरत राहून समाजाची सेवा करण्याचा मनोदय व्यक्त केला होता.

**पुणे-नाशिक-मुंबई सर्वोदयी वाटचाल :**

स्वातंत्र्योत्तर काळात ठकार दाम्पत्य पुणे येथे येवून राहू लागले. मुलगा विनायकलाही पुणे येथेच दाखल करण्यात आले. याचवेळी नानासाहेब ठकार यांच्याकडे श्रीगोंद्याजवळ घायपातवाडी येथील खादीग्रामोद्योग मंडळाचे कामकाज सोपविण्यात आले होते. तसेच सासवड जवळील पिंपळे या गावी 'सर्वोदय विद्यालय' सुरु करण्याचा निर्णय पुणेकरांनी घेतला. या विद्यालयाची संपूर्ण जबाबदारी नानासाहेबांवर टाकण्यात आली. नानासाहेबांनी या विद्यार्थ्यांना हडपसर जवळील मांजरी गावाच्या शेतावर शेती व्यवसायाचे प्रशिक्षण दिले.

यापुढील काळात नानासाहेब ठकार यांची नाशिक, मुंबई, बोरीवली या ठिकाणच्या सर्वोदयी विद्यालयांच्या निमित्ताने वाटचाल राहिली. शेवटी पुणे येथील गांधी स्मारक निधी संस्थेत आलेल्या नानासाहेबांनी राजीनामा देवून देशभरातील गांधी आश्रमांसारख्या संस्थांचा भेट दौरा हाती घेतला.

**गांधीवादी म्हणून सामान्य जीवन :**

गांधीवादाने झपाटलेले नानासाहेब देशसेवेचे व्रतस्थ होते. रेल्वेप्रवासात चहा-केकची अभिलाषा न धरता किंवा कोण काय म्हणेल ? याची तमा न बाळगता हे दाम्पत्य सातूचे पीठ पाण्यात कालवून खात. परिवारासह कुठे गेलेत तर लॉजींगला न थांबता धर्मशाळा किंवा मंदिरात आश्रय घेत. कोणालाही भार नको म्हणून आपले खाण-पान थोडेथाकडे साहित्य सोबतच बाळगीत. ग्रामसेवेच्या काळात जेवण झाल्यावर ताट धुवून घेत व तेच ताट पळीने वाजवित स्वत:च स्वत:च्या सभेची/भाषणाची दवंडी देत. प्रसंग पाहून ग्रामसेवेचे महत्त्व पटवून देत.

म. गांधीजींच्या निर्देशानुसार भारताचा दौरा करुन साबरमतीच्या आश्रमात परत येवून सर्व माहिती दिली होती. ही माहिती गांधीजींनी 'यंग इंडिया' मध्ये प्रकाशित केली होती. कायदेभंग, वैयक्तिक सत्याग्रह चळवळीतील सहभागामुळे कारावास भोगलेत. फैजपूर कॉंग्रेस अधिवेशनात एक महिना राबून निवास व्यवस्थेची जबाबदारी चोखपणे पार पाडली. काकासाहेब बर्वे, रामेश्वर भट यांच्या सहाय्याने 'भारत' साप्ताहिक सुरु करुन कॉंग्रेसच्या कार्याचा प्रचार-प्रसार केला. अशा या ग्रामसेवेच्या अग्रणी असलेल्या थोर गांधीवादी नेत्याला ७ मे या स्मृतीदिनानिमित्ताने विनम्र अभिवादन !

******

## सुजाण पालक

डॉ.अभिनय दरवडे
मो.७५८८१०४००७

# शाळकरी मुलांचा सोशल मीडियावरील मुक्त वावर काळजी आणि जबाबदारी

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे एक प्रभावी माध्यम बनले आहे. माहिती, संवाद, करमणूक, शिकवणी - सगळं काही एका क्लिकवर उपलब्ध आहे. मात्र याच डिजिटल सुलभतेचा वापर लहान वयातील मुले करत असल्याचं दिसून येतं. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हाट्सअॅप, स्नॅपचॅट यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर १० ते १८वर्षे वयोगटातील मुले सक्रिय असतात, जरी या प्लॅटफॉर्म्सच्या नियमांनुसार १८ वर्षांखालील व्यक्तींना प्रवेश नसावा अशी अट असली तरीही.



खोटी जन्मतारीख आणि बनावट माहिती-मुलं अनेकदा खोटी जन्मतारीख टाकून हे अकाऊंट्स उघडतात आणि वापरतात. सुरुवातीला हे केवळ करमणुकीपुरते असते, पण हळूहळू त्यात अडकण्याचे प्रमाण वाढते. काही वेळा ऑनलाइन मित्रत्व, चॅटिंग, फोटो शेअरिंग या गोष्टी त्या वयातील मुलांच्या समजुतीच्या पलीकडच्या असतात. हे डिजिटल जग त्यांच्यासाठी आकर्षक, पण अनेकदा धोकादायक ठरू शकते. सतत रिल्स पाहण्याची सवय लागल्यामुळे कित्येक अस्थिर झालेली मुलं रोज ओपीडित पालकांसोबत येतात! काल घडलेलं पुरतं विसरलेली ही मुलं, आज रिल्स पाहण्यात मशगुल असतात, त्यांना उद्याची चिंता तर सोडाच, पण आजचं सुद्धा भान उरलेलं नसतं! अशा वेळी शाश्वत संस्कार टिकून राहणं दिवसेंदिवस कठीण होत चाललंय!

**मुक्त इंटरनेट वापराचे परिणाम**

घराघरात वाय-फाय, स्वस्त इंटरनेट डेटा आणि स्मार्टफोन उपलब्ध असल्यामुळे पालकांच्या नकळत मुलं तासनतास ऑनलाईन असतात. सोशल मीडियावरील यशाचे मोजमाप 'लाईक्स', 'फॉलोअर्स', 'कॉमेंट्स' अशा कृत्रिम गोष्टींवर आधारलेले असल्यामुळे, मुलांच्या आत्ममुल्यांकनावर त्याचा थेट परिणाम होतो. बऱ्याचदा या फसव्या आभासी जगात ते इतके रममाण होतात की तिथल्या लाईक्स डिस्लाईक्स वर त्यांची वर्तणूक सुद्धा बदलत असते! आज मी अपलोड केलेल्या सेल्फी ला कमी लाईक्स आले म्हणून मला जेवायचं नाही मी अपसेट आहे असं म्हणणाऱ्या एका मुलीच्या आईवडिलांची चिंता वाढलेली मी नुकतीच ओपीडित अनुभवली! समुपदेशन करतांना असे कित्येक मुलं घरात कुठलाही संवाद साधत नाही मात्र इंटरनेट वर मात्र कमालीचे सक्रिय असतात हे बऱ्याचदा दिसून येतं!

**मन:स्वास्थ्य व व्यसनाचे वाढते प्रमाण**

हल्ली मुलांच्या समुपदेशनात इंटरनेट व्यसन, ऑनलाईन ट्रोलिंग,फोटो मोर्फिंग, व्हिडीओ मोर्फिंग, सायबर बुलिंग, सेल्फ-इमेज, कम्पेअरिंग, सतत मोबाईलमध्ये गुंतलेपणा या समस्या वारंवार ऐकायला मिळतात. मुलांच्या मनावर याचा विपरीत परिणाम होतो. झोपेचा अभाव, चिडचिड, एकलकोंडेपणा, अभ्यासातील रस कमी होणे ही लक्षणे स्पष्टपणे दिसून येतात. एका चांगल्या घरातल्या मुलाने जो अभ्यासात अतिशय हुशार , आणि सर्वांचा लाडका असलेला, सतत टॉप करणारा, अचानक एके दिवशी आईवडिलांकडे कबुली दिली, माझे फोटो कुणीतरी मोर्फ करून इंटरनेटवर टाकले आणि सायबर क्रिमिनलने मला त्यासाठी पैसे मागितले आणि ते वेळोवेळी मी ऑनलाइन दिले सुद्धा! मी आता पुरता फसलो आहे, तो पुन्हा पुन्हा पैसे मागतो आहे! मला वाचवा! सायबर शाखेकडे गुन्हा नोंदवला गेला आणि पुढे तो त्रास थांबला! पण अशा घटना वारंवार घडू लागल्या आहेत!म्हणून सतर्क राहणं सुद्धा तितकंच गरजेचं आहे!

**पालकांची भूमिका**

पालकांनी आपल्या मुलांशी संवाद वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. फक्त मोबाईल काढून घेणे किंवा ओरडणे हे उपाय नाहीत. त्याऐवजी सोशल मीडियाच्या फायद्यांसोबत धोकेही समजावून सांगणे, डिजिटल शिस्त लावणे आणि मुलांना विश्वासात घेऊन त्यांच्यावर लक्ष ठेवणे - ही अधिक प्रभावी पद्धत ठरू शकते. पालकांनी सुद्धा इंटरनेट साक्षर होणं गरजेचं आहे! त्या आभासी विश्वाचे फायदे तोटे समजून घेणं गरजेचं आहे! भासमान जगात आपल्या चेहऱ्याला हवं तसं आकर्षक बनवणारी ही पिढी प्रत्यक्षात मात्र चेहेऱ्यावर पाणी सुद्धा मारत नाही , दोन दोन दिवस अंघोळ सुद्धा करत नाही! तेव्हा स्व ची ओळख यांच्यात निर्माण केली पाहिजे! स्वतः च्या व्यक्तिमत्वाला घडवण्यासाठी मानसिक आणि शारीरिक स्वच्छतेकडे लक्ष द्यायला शिकवलं पाहिजे!

**समुपदेशन आणि शाळांची जबाबदारी**

शाळांमध्ये 'डिजिटल साक्षरता' हा विषय शिकवला गेला पाहिजे. सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर कसा करावा, त्याचे काय काय धोके आहेत, सायबर क्राईम काय असतो - याची माहिती मुलांना व त्यांच्या पालकांना नियमितपणे दिली गेली पाहिजे. या मोहजालात अडकण्याच्या शक्यता सुद्धा समजवून सांगायला हव्या! आकर्षक दिसण्याच्या नादात कोणते फोटो आपण इंटरनेट वर शेअर करतो आणि त्याचे काय परिणाम होऊ शकतात हे सुद्धा शिकवलं पाहिजे! उथळ मत प्रदर्शन टाळणं सुद्धा शिकवलं पाहिजे!

**निष्कर्ष:**

सोशल मीडियाचा वापर हा टाळणं शक्य नाही, पण तो सुरक्षित, जबाबदारीपूर्ण आणि वयानुसार योग्य असावा याची खात्री मात्र आपण सर्वांनी मिळून करायलाच हवी. लहान वयात सोशल मीडियाचा अनियंत्रित वापर ही काळजीची बाब असून त्याला गांभीर्याने घेणे, हे आपले सामूहिक कर्तव्य आहे.

## राशी भविष्य


सुमेध रानडे, पुणे
मो.९५६१०९३७४०







**११ मे ते १७ मे**




- मिथुन तूळ कुंभ - यांना चांगले फलित
- मेष कर्क कन्या धनू मकर - यांना बेताचे हित;
- वृषभ सिंह वृश्चिक मीन - यांना चुकलेले गणित

मेष: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला राशीत होणारी पौर्णिमा वैवाहिक आणि घरगुती आयुष्यात समाधान कारक बदल घडवून आणेल. आवडीचा प्रवास होऊ शकतो. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात रवी आणि गुरुचे राशी परिवर्तन तुमच्यासाठी आर्थिक आणि कौटुंबिक बाबतीत सुधारणा करण्याची शक्यता आहे. एखादा हवा असलेला पत्रव्यवहार किंवा बातमी मिळू शकते. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी मात्र वडीलधाऱ्या व्यक्तींची काळजी घेणे चांगले राहील. त्याचबरोबर नोकरी व्यवसायात जोखीम किंवा अती आत्मविश्वास टाळा!

वृषभ: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला होणारी पौर्णिमा तुम्हाला थोडी त्रासाची जाऊ शकते. राग मनस्ताप भांडणे डोकं वर काढू शकतात. किरकोळ डोकंदुखी होऊ शकते. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात होणारे गुरुचे राशी परिवर्तन तुम्हाला दिलासादायक ठरेल. अडकलेले काम सुटेल. तब्येतीत सुधारणा होईल. वैवाहिक बाबतीत मात्र गैरसमज टाळा. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी आईवडिलांसंबंधी एखादी काळजी लागण्याचा संभव आहे. महत्त्वाचे जमिनीचे घराचे व्यवहार टाळा. वाहन सावकाश चालवणे हितकारक ठरेल!

मिथुन: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला होणारी पौर्णिमा तुम्हाला संतती संबंधी चांगली परिणाम कारक ठरेल. अभ्यास शिक्षण कला या क्षेत्रात उत्तम फलदायी राहील. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात राशीत होणारे गुरुचे भ्रमण तुम्हाला नोकरी व्यवसायात यश देण्याची शक्यता आहे. एखादा प्रवास घडू शकतो. त्यातून फायदा होण्याची शक्यता. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी भावा बहिणी संबंधी चिंता उत्पन्न होऊ शकते. जोडीदारा संबंधी मात्र तुम्ही भाग्यवान राहाल. वैवाहिक सौख्य चांगले लाभेल.

कर्क: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला होणारी पौर्णिमा तुम्हाला कार्यक्षेत्रात उत्तम संधी देण्याची शक्यता आहे. आई वडिलांच्या बाबतीत आनंददायी घटना घडू शकते. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात रवीच्या राशी परिवर्तनाचे चांगले परिणाम मिळतील. एखादा आर्थिक लाभ संभवतो. मित्र मैत्रिणी ओळखीच्या लोकांकडून पैसे मिळू शकतात. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी मानसिक थकवा येऊ शकतो. वैवाहिक जोडीदाराशी मतभेद होऊन त्रास होण्याची शक्यता. त्यामुळे बोलण्यावर नियंत्रण ठेवा आणि समजूतदारपणे वागा!

सिंह: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला होणारी पौर्णिमा तुम्हाला अपेक्षित पत्रव्यवहार देण्याची शक्यता आहे. प्रवासातून फायदा होईल. धार्मिक कार्यक्रम किंवा तीर्थयात्रा घडू शकतात. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात रवीचे राशी परिवर्तन तुम्हाला कार्यक्षेत्रात नवीन संधी देऊ शकतो. तुमचे काम चारचौघात उठून दिसण्याची शक्यता आहे. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी किरकोळ तब्येतीचे आजार होण्याची शक्यता. कफ खोकला सर्दी होऊ शकते त्यामुळे काळजी घ्या. थंड पदार्थांपासून सावध रहा. शेगडी काडेपेटी आणि इतर ज्वलंत पदार्थांच्या ठिकाणी विशेष सावधता बाळगा!

कन्या: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला पौर्णिमा तुम्हाला त्रासाची जाण्याची शक्यता आहे. नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांकडून एखादी फसवणूक होऊ शकते त्यामुळे जपून वागा. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात रवी आणि गुरुचे राशी बदल तुम्हाला चांगले बदल घडवून देतील. अडकलेले काम सुटेल. नवीन मार्ग सापडतील. प्रकृतीची काळजी घ्या. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी घरसंबंधी एखादी चांगली घटना घडेल. किंवा घरातील कोणाचा तरी उत्कर्ष होईल. त्यामुळे फार काळजी न करता घरातल्यांच्या आनंदात सामील व्हा!

तूळ: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला राशीत होणारी पौर्णिमा तुम्हाला वैवाहिक समाधान देऊन जाईल. भांडण मिटून सलोखा होईल. नोकरी व्यवसायात उत्तम फळ. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात गुरुचे राशीपरिवर्तन तुम्हाला अनुकूल ठरेल. अडकलेल्या कामात भाग्याची साथ मिळण्याची शक्यता आहे. पैशाचे पाकीट आणि पर्स मात्र सांभाळा! **शेवट** – आठवड्याच्या शेवटी चंद्र बुध त्रिकोण योग तुम्हाला एखादा आवडीचा प्रवास घडवून देईल. मात्र रवीचे भ्रमण तुम्हाला तब्येत जपण्याचा संकेत देत आहे त्यामुळे कसलेही कुपथ्य नको!

वृश्चिक: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला होणारी पौर्णिमा तुम्हाला भावनिक पातळीवर परिणाम करणारी ठरेल. हसू रडू दोन्हीचा अतिरेक उफाळून येण्याचा संभव आहे. फक्त विश्वासाच्या लोकांसोबतच मोकळे व्हा. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात गुरुचे राशीपरिवर्तन तुम्हाला जाता जाता एखादी आनंदी घटना देऊन जाण्याची शक्यता आहे. मात्र कुटुंबामध्ये जबाबदारी पडण्याची शक्यता. कोणताही वाममार्गाचा पैसा पूर्णपणे बंद करा! **शेवट** – आठवड्याच्या शेवटी व्यवसायात मोठे बदल घडण्याची शक्यता आहे. एखादा अनपेक्षित फायदा होऊ शकतो. जोडीदाराचा उत्कर्ष होईल.

धनू: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला होणारी पौर्णिमा तुम्हाला लाभदायक ठरण्याची शक्यता आहे. प्रेम प्रकरणात प्रगती होईल. आवडती प्रिय व्यक्ती भेटण्याचा संभव आहे. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात गुरुचे राशी परिवर्तन तुम्हाला विशेष परिणाम कारक जाईल. वैवाहिक समस्या सुटतील. भागीदारीतल्या अडचणी सुटतील. नवीन कार्यक्षेत्र उपलब्ध होण्याची शक्यता आहे. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी संतती संबंधी आनंददायी घटना घडू शकते. कुटुंबात एखादी जबाबदारी तुमच्या अंगावर पडू शकते. त्यामुळे सज्ज व्हा आणि आनंदाने स्वीकार करा!

मकर: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला होणारी पौर्णिमा तुम्हाला गृह सौख्य देऊन जाईल. नोकरी व्यवसायात एखादा लाभ होऊ शकतो. तुमच्या कर्तृत्वाचे कौतुक होऊ शकते! **मध्य** – आठवड्याच्या मध्यात रवीचे राशी परिवर्तन तुम्हाला संतती विषयक एखादी चिंता देऊ शकते. स्पर्धेत किंवा परीक्षेत एखादे अपेक्षित यश हुकण्याची शक्यता आहे. म्हणून अती अपेक्षा न ठेवलेल्या चांगल्या. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी वैवाहिक जोडीदारा सोबत आनंदाचा प्रसंग येईल. एखादा प्रवास घडू शकतो. परदेशात जाण्यासंबंधी अनुकूलता मिळेल!

कुंभ: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला होणारी पौर्णिमा तुम्हाला एखादे ध्येय साध्य करायला मदत करेल. जिद्दीने करत असलेले काम तुम्ही पूर्ण कराल त्यातून चांगले परिणाम मिळण्याची शक्यता आहे. **मध्य** – आठवड्याच्या मध्यात गुरुचे राशी परिवर्तन तुम्हाला अनुकूल ठरणार आहे. आरोग्यात सुधारणा, एखादा धनलाभ आणि संतती संबंधी अनुकूल घटना घडू शकतात. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी मात्र वैवाहिक जीवनात अचानक एखादे भांडण उद्भवू शकते. कोणत्याही परिस्थितीत वादविवाद टाळा आणि संयम ठेवा. भावंडांच्या बाबतीत आनंदाची बातमी मिळू शकते.

मीन: **सुरुवात** – आठवड्याच्या सुरुवातीला होणारी पौर्णिमा तुम्हाला कौटुंबिक उलाढालींची जाईल. जास्त जबाबदारी अंगावर पडण्याची शक्यता आहे त्यामुळे कंबर कसून तयार व्हा! **मध्य** – आठवड्याच्या मध्यात संतती संबंधी अनुकूल घटना घडेल. घरातील स्त्रियांकडून लाभ होऊ शकतात त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐका. एखादा प्रवास घडून आनंद मिळण्याची शक्यता. **शेवट** – आठवड्याच्या शेवटी भावा बहिणीत किरकोळ वादविवाद भांडणं होऊ शकतात. कोणत्याही परिस्थितीत राग लोभ यांच्या अधीन होऊ नका. स्पर्धाभाव आणि बरोबरीची भावना नको!

शौर्योद्‌गारांचा इतिहास
अर्जुन वेलजाळी
मो.९०४९५२२२४०

# अशीच अमुची आई असती सुंदर रुपवती, आम्हीही सुंदर झालो असतो, वदले छत्रपती

हिंदवी स्वराज्यात कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला नजराणा म्हणून शिवाजी महाराजांसमोर त्यांचे सरदार आबाजी सोनदेव यांनी सादर केल्यानंतर त्यांना योग्य ती समज देऊन शिवाजी राजांनी त्या स्त्रीला सन्मानाने आपल्या सासरी परत पाठवले. या सत्य घटनेवर आधारीत कवी मधुकर भावे यांची रचना असलेले व ज्येष्ठ गायक व संगीतकार दशरथ पुजारी यांनी गायलेले हे श्रवणीय भावगीत. शिवाजी महाराजांच्या मनात स्वराज्य अथवा स्वराज्याबाहेरीलही स्त्रियांबद्दलच्या आदराच्या, पावित्र्याच्या भावनेचे व उदात्त धोरणाचे दर्शन सत्य घटनेवरील या भावगीतातून घडते. मुळातच शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना ही माता जिजाऊंच्या प्रेरणा व मार्गदर्शनाने स्त्रीसन्मान व गोरगरीबांच्या सुरक्षा आणि रक्षणासाठी स्थापन केले.



शिवपूर्वकाळात महाराष्ट्रावर निजामशाही, आदिलशाही या मुस्लिम राजवटींची सत्ता होती. 'प्रजा प्रजा हिंदू व राज्यकर्ते मुस्लिम' यामुळे साहजिकच मुस्लिम राज्यकर्त्यांच्या या राजवटीत स्थानिक हिंदू गोरगरीब प्रजेवर मुस्लिम राज्यकर्ते, त्यांचे सरदार, वतनदार, कारभारी, पाटील हे अन्याय, अत्याचार व आर्थिक पिळवणूक करीत असत. प्रजेशी अतिशय अत्यंत वाईट पद्धतीने वर्तन करून त्यांना नागवले जात. स्त्री म्हणजे उपभोगाची वस्तू म्हणून दिवसा ढवळ्या स्त्रियांशी बदसलुखी, बदकर्म, बदवर्तन, बलात्काराच्या घटना घडत. स्त्रियांना पळवून नेणे, त्यांची अब्रु लुटणे, स्त्रियांना बळजबरीने जनानखान्यात ठेवणे, गुलाम करणे अशा घटना सर्रास घडत. अशा सामाजिक वातावरणात व प्रतिकूल परिस्थितीत शिवाजी महाराजांनी गोरगरीब जनतेच्या सुखासाठी व स्त्रियांचा आत्मसन्मान जपण्यासाठी स्वराज्याची स्थापना केली. अपार मेहनत व लढवय्या मावळ्यांच्या सहकार्याने स्थापन केलेल्या राज्याला शिवाजी महाराजांनी कधीही स्वतः चे राज्य मानले नाही, तर जनतेचे राज्य व स्वतःला त्या राज्याचे सेवक मानले. त्यामुळे स्वराज्याचा कारभार करतांना त्यांनी आपल्या सरदार, अधिकारी, कारभारी, प्रत्येक गावचे पाटील, तसेच युद्धात लढणाऱ्या सैनिकांना अशी सक्त ताकीद दिली होती, की आपल्याकडून गोरगरीब प्रजा व स्त्रियांवर कोणताही अन्याय, अत्याचार व दुर्वर्तन होणार याची काळजी घेटली जावी. तसेच अशा कडक ताकीद दिल्यानंतरही यासंदर्भात कोणाकडूनही काही गैरवर्तन अथवा गैरकृत्याचा गुन्हा झाल्यास त्यांना अत्यंत कडक शिक्षा देण्याचे धोरण त्यांनी अवलंबले होते. 'जसे गैरकृत्य त्याप्रमाणे शिक्षा !' असे धोरण शिवाजी महाराजांनी स्वीकारले होते. त्यानुसार अशा गुन्हेगारांच्या गैरकृत्यांना ' कडेलोट करणे, हत्तीच्या पायाखाली देणे, अधिकारपद काढून घेणे, शिरच्छेद करणे, दरबारात बटीक बनवणे, चौरंगा करणे (गुन्हेगाराचे दोन्ही हात व पाय तोडून टाकणे) अशा कडक शिक्षा शिवाजी महाराजांनी दिल्या, की जेणेकरून असे गैरकृत्य अथवा गुन्हे स्वराज्यात पुन्हा कोणी करण्याची हिंमत करणार नाही.

अशाच प्रकारे शिवाजी महाराजाच्या वयाच्या १६ व्या वर्षी स्वराज्यात घडलेल्या घटनेवर आधारीत वरील अतिशय सुंदर असे भावगीत. कल्याणच्या आसपास आबाजी सोनदेव हे शिवाजी महाराजांचे सरदार होते. तिथे कल्याणमध्ये विजापूरचा सुभेदार मुलाणा हयाती / काजी मुलाणा हा होता. त्याचा शिवाजी महाराजांच्या सैनिकांनी पराभव करून खजिना लुटला. त्या खजिन्यासोबतच सुभेदाराची सून मराठे सैनिकांच्या हाती सापडली. सुभेदार आबाजी यांनी लुटलेल्या खजिन्यासह त्या सुभेदाराच्या सुंदर सुनेलाही नजराणा म्हणून शिवाजी महाराजांसमोर हजर केले, तेव्हा महाराजांनी स्वराज्याच्या स्त्रीविषयक आदर्श धोरणाची पायमल्ली केल्याबद्दल आपल्या सरदाराची कडक शब्दात कानउघाडणी करून कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा नजराणा म्हणून स्वीकार न करता तिच्या सौंदर्याचे वरील शब्दात कौतुक करून तिची साडी, खणानारळाने ओटी भरून तिला सन्मानाने पालखीत बसवून तिच्या सासरी पाठवणी केली. आमची आई जर अशीच सुंदर असती तर आम्हीही असेच सुंदर झालो असतो, असे म्हणून तिला आईचा दर्जा देतात. इतिहासकारांमध्ये या घटनेबद्दल मतभेद असले तरी शिवाजी महाराजांच्या मनात स्त्रिया व परधर्माबद्दल नितांत आदर व सहिष्णू वृत्ती व धोरण होते हे मात्र नक्की ! शिवाजी महाराजांच्या स्त्रीविषयक धोरणासंबंधी मुघल इतिहासकार काफीखान लिहितो, की 'शिवाजी महाराज स्वराज्यातील स्त्रियांशी बहीण-भाऊ व आई-मुलाप्रमाणे वागतात. शिवाजीसारखा चारित्र्यसंपन्न व परधर्माबद्दल पराकोटीची सहिष्णूता असलेला राजा देशात दुसरा नाही. शिवाजी राजांना स्त्रियांबद्दल कमालीचा आदर आहे.' जेव्हा शत्रू सुद्धा शिवाजी राजांच्या चारित्र्यसंपन्नतेचे कौतुक करत असेल तर अशा अनेक प्रसंग व घटनांतून शिवाजी महाराजांनी आपले चारित्र्य व धर्मसहिष्णुता दाखवली असेल हे सिद्ध होते, मग त्यासाठी प्रत्यक्ष पुरावे असो वा नसो... !

रांझाच्या भिकाजी गुजर पाटलाने आपल्या पाटीलकीच्या गर्वात एका गरीब मुलीची अब्रू लुटली. या प्रकरणाची शिवाजी महाराजांनी आपल्या माणसांकडून शहानिशा करून पाटलाची पाटीलकी काढून घेऊन त्याचा चौरंग केला ( दोन्ही हातपाय तोडणे ). बेळवाडीच्या स्त्री किल्लेदार सावित्री देसाई हिचा पराभव करून बेळवाडीचा किल्ला जिंकल्यानंतर विजयाच्या उन्मादात शिवाजी महाराजांचा सरदार भिकुजी गायकवाड याने सावित्रीवर बलात्कार केला, ही घटना महाराजांना समजताच त्यांनी तात्काळ सकुजीचे डोळे काढून टाकण्याची शिक्षा देऊन त्याला आयुष्यभरासाठी तुरुंगात टाकले. उदाराम माहूरकर देशमुख हा शहाजहानचा सरदार राजपुतांविरुद्ध भातवडीच्या युद्धात मरण पावला. त्यानंतर त्याच्या पत्नीने अनेक वर्ष राजपुतांशी सामना केला, म्हणून पुढे तिला औरंगजेबाने तिला ' रायबाघीण ' किताब दिला. पुढे रायबाघीण व शिवराय यांचा संबंध उंबरखिंडच्या युद्धात आला. शिवरायांनी मोगलांचा फडशा पाडून सुरत लुटून खिंडीच्या दिशेने येत असताना रायबाघीण हिने त्यांना अडवले. शिवाजी महाराजांच्या सैन्याने तिला चोहोबाजूने घेरून तिला जेरीस आणले, तेव्हा ती महाराजांना शरण आली. मात्र शिवाजी महाराजांनी ती शरण आल्यावर तिच्याशी शत्रूभाव न ठेवता तिला वस्त्रालंकार देऊन तिचा आदरसन्मान केला. नंतर ती स्वतःला शिवाजी महाराजांची धर्मकन्या मानू लागली. केदारसिंह नावाच्या राजपुताच्या ताब्यात असलेला प्रबळगड अनेक दिवस लढूनही ताब्यात येईना, म्हणून शिवाजी महाराजांनी किल्ल्यावर हल्ला चढवला. केदारसिंहाने प्राणपणाने किल्ला लढवला. शेवटी नाईलाजाने रजपूत स्त्रियांनी जोहार करून ते महाराजांवर तुटून पडला, मात्र त्याचा पराभव झाला. केदारसिंहाची आई व बायको मराठ्यांच्या हाती सापडल्या. तेव्हा राजांनी त्यांना त्यांच्या इच्छेनुसार वस्त्रे देऊन मोठ्या उदार भावनेने त्यांचा मानसन्मान करून त्यांना पालखीत बसवून आपल्या देशी त्यांची पाठवणी केली.

योद्धा स्त्री स्वराज्यातील असो वा पर राज्यातील, स्वधर्मातील असो वा परधर्मातील ! तिच्यावर अन्याय झाला असेल किंवा युद्धात तिचा पराभव झाला असेल, ती शरण आली असेल तिला शिवाजी महाराजांनी शत्रू न मानता स्त्री म्हणून सन्मान केला जाई. शिवाजी महाराजांचे स्त्रीविषयक धोरण असे उदात्त व सहिष्णू होते. ' स्त्री म्हणजे मराठ्यांच्या देवालयातील देवता ! ' गाईच्या जीवाला आणि बाईच्या पदराला हात घालाल तर गय केली जाणार नाही, अशी सक्त ताकीद महाराजांनी दिली होती. स्वराज्याचा वापर स्वतःच्या चैन व समृद्धीसाठी साठी नसून स्वराज्यातील जनतेच्या हितासाठी व सुखासाठी करणारे छत्रपती शिवाजी राजे हे तत्कालीन इतर राजांपेक्षा वेगळे ठरतात. म्हणून शिवाजी महाराजांना स्वराज्यातील रयतेच्या मनामनात स्थान होते. शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने हिंदूहृदयसम्राट होते.

हसा ना गडे
दत्ता जोशी
मो.८३२९९२२०२७

# मी एकाएकी पंडित कसा झालो!

एका छोट्याश्या खेडेगावात माझी शिक्षक म्हणून बदली झाली होती. शहरा पासून खूप दूर असलेलं हे गाव होतं. गाव छोटं होतं पण खूप सुंदर होतं. समोर हिरवेगार डोंगर होते. अगदी हाकेच्या अंतरावर नदी होती. नदीवर एक धरण बांधलेलं होतं. धरणाच्या एका बाजूला दूरवर नदीच पाणी पसरलेलं होतं. एका सुंदर रेस्ट हाऊसच बांधकाम धरणावर भेटीसाठी येणाऱ्या पाहुण्यांसाठी सुरु होतं. आता ते जवळ जवळ पूर्ण व्हायला आलेलं होतं. एका छोट्याशा टेकडीवर एक मंदिर होतं. गावात एकुलतं एक छोटसं हॉटेल, असं ते सुबक गाव होतं. गावात आठवड्यातून एक दिवस बाजार भरायचा. लोकही खूप चांगले होते. सगळे जण एकमेकांना ओळखत असतं.

आमची शाळा पण छोटीशीच होती. जसं जमेल तसं विध्यार्थी शिकायला यायचे. इतर वेळी शाळेच्या व्हरांडयात गावातली पाटील, देशमुख वगैरे मोठं मोठी वजनदार मंडळी जमा व्हायची आणि गप्पांचा अड्डा जमायचा. सगळ्या गावच्या अडचणी, भानगडीत तिथं कळून यायच्या.त्या दिवशी संध्याकाळी सगळे जणं काळजी मध्ये दिसले.

मास्तर, लई वाईट झालं हो. गावातले एकुलते एक गुरुजी वारले हो. गुरुजी म्हणजे? पूजा करणारे हो. अरेरे, वाईटच झालं. वाईट पेक्षा दुसरी काळजीची गोष्ट निर्माण झालीय. पाटील म्हणाले. काय झालं. मी विचारलं. अहो, आपल्या धरणावरच्या रेस्ट हाऊसच बांधकाम नुकतंच पूर्ण झालंय. मागच्याच आठवड्यात धरणावरचा इंजिनियर येवून गेला वाड्यावर. म्हणाले पाटील, रेस्ट हाऊस झालंय पूर्ण आता कलेक्टर साहेबाला बोलावून त्याचं उदघाटन करून टाकू या.

करून टाकू या ना मग. मी मुलांकडून स्वागतगीत वगैरे तयारी करून घेतो.

नाही हो, मास्तर ते नाही झालं तरी चालेल. कलेक्टर खूपच धार्मिक आहे. पूजा झालीच पाहिजे म्हणतो. धरणाचं काम आहे.काही देवाधर्माचं राहून गेलं तर प्रॉब्लेम व्हायचा म्हणतो. हजारो लोकांच्या जीवाचा प्रश्न आहे.

मग करून टाका ना पूजा. मी म्हटलं.

कसं काय करून टाका. पूजा करायला बामण तर भेटायला पाहिजे ना. आजूबाजूच्या बारा तेरा गावात हाच एक होता. आता तोही नाही. या रविवारी उदघाटन आहे. गावचा पाटील म्हणून त्यांनी माझ्यावरच जबाबदारी टाकलीय. काय करावं समजत नाही. ऐन वेळेवर ब्राह्मण कुठून आणायचा.



सगळ्यांनाच टेन्शन आलं होतं. सगळेच विचार करत बसले. अचानक पाटलांच्या डोक्यात एक प्रश्न आला.म्हणाले, मास्तर तुम्ही पण तर बामणच आहात नं.

मी तर एकदम दचकलो. अहो, ब्राह्मण असलो तरी पूजा करणारे ब्राह्मण वेगळेच असतात. मी म्हणालो.

वेगळे म्हणजे काय त्यांना चार हात वगैरे असतात की काय.

पाटील बोलले. आता यात हसण्या सारखं काही नव्हतं तरी सगळे हसले. काही नाही मास्तर, हे काम आता तुम्हीच पार पाडून द्या. तुम्ही शिकलेले आहेत. तुम्हाला सहज जमेल. गावाचं काम आहे. अशा वेळी कामाला नाही यायचं तर मग कधी. अहो, मी कधी आयुष्यात पूजा केलेली नाही. मला ना मंत्र येतात ना काही पद्धत माहिती आहे. काय सामान लागतं,ते सामान कुठं मिळत, काही म्हणजे काहीच माहिती नाही. छे छे, अजिबात जमणार नाही.

जमलं हो. आम्ही सगळे मदत करू तुम्हाला. माझ्या जवळ नवं धोतर आहे. त्या वर तुम्ही झब्बा घाला. एक टोपी उपरणं घातलं आणि कपाळाला लाल गंध लावला ना की तुम्ही एकदम सभ्य दिसायला लागाल. मग काय लागतं त्याला, झालं ना सगळं तयार. कोणाला कळणार पण नाही. ड्रेस चा आणि पूजेचा काही संबंध नसतो हो, मंत्र तर यायला पाहिजे की नाहीत. मी काकुळतीने सांगत होतो. पण कोणाला माझं म्हणणं पटतच नव्हतं. एका बाजूला पूर्ण गाव आणि दुसऱ्या बाजूला एकटा मी असे दोन गट पडले आणि नाईलाजाने मला त्यांचं म्हणणं ऐकावं लागलं. सगळे खूष होऊन घरी गेले. मला तर टेन्शन खूपच आलं होतं. झोपच उडून गेली. आज रविवार होता. पूजा पुढच्या रविवारी होती. म्हणजे हातात तयारीला सहा दिवस होते. दुसऱ्या दिवशी सकाळीच पाटील धोतर, उपरणं, टोपी घेऊन घरी आले. सोबत पाच सहा गावकरी होते. धोतर मी कधी आयुष्यात नेसलेले नव्हते. मग तो दिवस मला धोतर कसे नेसावे हे शिकवण्यात गेला. धोतरात खूप अवघडल्या सारखं वाटत होतं. शिवाय धोतर सुटून जायची पण भीती होती. मग एकाने गाठ मारून धोतर कसं नसायचं ते शिकवून तो प्रश्न सोडवून टाकला.

धोतर, झब्बा, टोपी, उपरणं मी घातलं. आरशात पाहिलं. तंतोतंत भटजी वाटतं होतो. पण मंत्रांचं आणि पूजेचं काय करायचं. मला तर काहीच येत नव्हतं. मी माझी अडचण सगळ्या गावकऱ्यांना सांगितली.

नशिबाने मला एक गावकरी भेटला. तो वारकरी होता. त्याच्या घरी सर्व पूजा संग्रहाचं एक पुस्तकं होतं. त्याने ते आणून दिलं. पुस्तकं पहिल्या बरोबर माझ्या सगळ्या काळज्याच नष्ट झाल्या. त्या पुस्तकात हरतालिका, मंगळागौर, अनंत, पार्थिव गणपती, ऋषींपंचमी आणि सगळ्यात शेवटी सत्यनारायणाची पूजा होती.त्यातच पोथी पण होती. मंत्र दिलेले होते. पद्धत दिली होती. सगळं काही व्यवस्थित दिलेलं होतं. माझा आनंद गगनात मावेनासा झाला.

दुसऱ्या दिवसा पासून मी प्रॅक्टिस सुरु केली. श्लोक पाठ करणे, पूजेच्या नोट्स काढणं. असा सर्वांगीण अभ्यास सुरु केला. मी त्या अभ्यासात एव्हढा मग्न झालो होतो की प्रत्येक वर्गात शिकवायला जायच्या आधी मुलांना गंध लावायचो. त्यांना आचमन करायला सांगायचो. एक प्रकारे आम्हा सगळ्यांचा अभ्यासच सुरु झाला होता.

त्या काळात अभ्यासा ऐवजी मुलांचे जास्त श्लोकच पाठ झाले. आमची शाळा एक प्रकारे जणू संस्कृत पाठ शाळाच झाली. मी शर्ट पॅन्ट सोडून धोतर टोपी घालून शाळेत यायला लागलो.गावातले लोकं पण मला त्या वेषात पाहून वाकून नमस्कार करायला लागले होते. इकडे माझी जशी तयारी सूरू झाली तशी तिकडे धरणावर पण जोरात तयारी सुरु झाली होती. पताका बिताका लावण्या सुरु झाल्या. सामानाची जुळवा जुळव सुरु झाली. प्रसादाचं सामान, फुलं, पाहुण्यासाठी हार गुच्छ, पूजेसाठी सगळं सामान सगळी तयारी उत्साहात सुरु झाली. गावातल्या एका संगीत येणाऱ्या माणसाने तर मुलांकडून तबला पेटीवर आरती बसवून घेतली.

एकदिवस अचानक मला वर्गातल्या एका मुलाने बातमी दिली की सर माझे बाबा, कलेक्टर साहेबाच्या ऑफिस मध्येच कामाला आहे. साहेबांचं संस्कृत खूप चांगलं आहे. त्यांच्या घरी दर पौर्णिमेला पूजा असते.

मला तर ते ऐकल्यावर थंडीचं भरली. बापरे, आता कितीही प्रयत्न केला तरी मला पूजा येत नाही. हे बिंग त्या साहेबाला लगेच लक्षात येईल. माझे तर हातपायच गळाले. तोंडाला कोरड पडली. थोडंफार जे पाठ केलं होतं तेही विसरायला झालं.

रविवारचा दिवस उजाडला. सकाळ पासून सगळे उत्साहात होते. रांगोळ्या काढलेल्या होत्या.कलेक्टर साहेबांना आणायला लेझीम ची पोरं तयार होती. लाऊड स्पीकर वर गाणी जोर जोरात वाजत होती. मी, एक सोडला तर कोणालाच टेन्शन नव्हतं. उगाचच नको ती झंझट मी मागे लावून घेतली होती. काहीच सुचत नव्हते. मला तर सगळ्या अंगात कसकसं भरल्या सारखी वाटतं होती अकरा वाजले. कलेक्टरची गाडी दूरवरून दिसायला लागली. मी पण भटजीच्या वेषात गंध वगैरे लावून उसनं अवसान आणून तयार बसलो होतो. पूजा मांडून ठेवली होती. कलेक्टर गाडीतून खाली उतरले. लेझीम वाजवत त्यांना धरणा वरच्या रेस्ट हाऊस वर नेलं गेलं. त्यांनी रिबीन कापली आणि पूजेला सुरवात करणार तेव्हढयात त्यांना एक फोन आला. मी धोतर नेसून पूजेला बसण्याची वाट पाहात बसलो होतो. साहेब, फोन घेऊन आले आणि मलाच हात जोडून म्हणाले, गुरुजी माफ करा हं, आताच जिल्ह्याच्या गावावरून आणि अर्जंट फोन आला होता. मंत्री येताहेत व्हिजिटला. मला अर्जंट जावं लागेल. तुम्ही पूजा दहा मिनिटात आटपा.आणि मला मोकळं करा. बातमीदार आले होते. त्यांनी कलेक्टर साहेबांसोबत माझे पूजा करतांना फोटो काढले. माईक वर जोरजोरात गाणी सुरु होती. मी काय बोलत होतो. त्यांना ऐकू येत नव्हतं. मी त्यांना हळदी, कुंकू, अक्षता, फुलं वाहायला सांगितली. नेवेध्य दाखवला आणि पोथी न वाचता. डायरेक्ट आरती करायला घेतली. आमचं संगीत पथक एकदम तयार होतं. प्रचंड जोशात,खणखणीत आवाजात तबला पेटीच्या तालावर आरती सुरु झाली.कलेक्टर साहेब आणि त्यांच्या बाई एकदम जाम खूष झाल्या. एक जाडजूड दक्षिणेचे पाकिटं मला त्यांनी वरून दिले. पाटील पण जाम खूष झाले. त्यांनी मला आंनदाने मिठीच मारली.पूजेनंतर जेवण होतं. एकदाचा कार्यक्रम पार पडला.

दुसऱ्या दिवशी मला अचानक समजलं की मी दणकून प्रसिद्ध झालो आहे. सगळी कडून मला फोन यायला लागले. कारण गावच्या आणि जिल्ह्याच्या वर्तमानपत्रात आमच्या पूजेची बातमी आणि कलेक्टर साहेबांसोबत माझे फोटो छापून आले आणि मी एकाएकी एक प्रकांड पंडित म्हणून मी प्रसिद्ध होऊन गेलो.

# आपली जगण्याची गुणवत्ता फक्त पैसा कशी ठरविणार ?

(पान ३ वरुन) केलं होतं. त्यामध्ये आपल्या मुलांनी कोणत्या गोष्टी शिकाव्यात,असं तुम्हाला वाटतं? असा प्रश्न मी उपस्थित पालकांना विचारला. बहुतेक सगळ्या पालकांची गाडी 'शाळेच्या परीक्षेत भरपूर मार्क' याच गोष्टीपाशी अडली होती. नॅशनल एन्ट्रन्सेस मध्ये स्कोअर झाला की बस्स.. डोक्यात एवढा एकच विचार.. आपल्या जगण्याची गुणवत्ता फक्त पैसा कशी ठरवणार?

आपल्या मुलामुलींचा सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक बुद्धिभेद का होतो आहे? मी, माझं, मला, फक्त माझ्यापुरतं हा फॉर्म्युला आपल्या मुलांच्या भविष्याच्या दृष्टीनं कितपत उपयोगी पडणार आहे? आयुष्यात पैसा हेच एकमेव सत्य आहे ही धारणा आपल्या मुलांना सुरक्षित आणि स्वस्थ जगवेल का? असे प्रश्नच पालकांना पडत नाहीत, ह्याचं मला फार आश्चर्य वाटलं आणि तेवढंच वाईटही वाटलं. आपल्या मुलामुलींना चांगले मित्र मैत्रिणी नाहीत, चांगलं वाचनीय साहित्य त्यांना ठाऊक नाही, विद्वानांचा सहवास नाही, आपल्याला मिळालेल्या चांगल्या आयुष्याविषयी कृतज्ञता नाही. निदान आपल्या चांगल्या आरोग्याविषयी तरी दैनंदिन जीवनात बदल घडवायला हवा,तर तेही नाही. जर असं असेल तर हा केवळ शिक्षणव्यवस्थेचा दोष नाही. नव्या पिढीला घडवण्याचं धोरण समाजानंच ठरवण्याची गरज आहे. कारण, कुठलाच पुस्तकी अभ्यासक्रम आणि मार्कलिस्ट आपल्या मुलांच्या सुदृढ, समंजस आणि शहाण्या जगण्याचा पाया घालण्यासाठी पुरा पडणार नाही. शाळा, कुटुंब आणि समाज या तिघांनीही एकत्र येऊन काही नीति ठरवली तर हे चित्र बदलता येईल. समाजातल्या प्रत्येकानं 'ही माझी जबाबदारी आहे' असं मान्य करुन सक्रिय सहभाग घेतला नाही, तर आपल्या पुढच्या पिढ्यांची आयुष्याची वस्त्रं अशी फाटत राहतील,ज्यांना लावायला ठिगळं अपुरी पडतील. पुस्तकी अभ्यास, विद्याभ्यास आणि कौशल्याभ्यास या तीनही वेगळ्या गोष्टी आहेत. आपल्या आयुष्यात या तीनही गोष्टी महत्त्वाच्या आहेत,हे मान्यच आहे. पण शाळेची सुट्टी ही पुस्तकी अभ्यासाची सुट्टी आहे, असं लक्षात घेऊन जीवनविद्या आणि कौशल्य विकास या दोन्हीं विकासांवर भर द्यायला हवा. जाणिवेच्या समृद्धीपासून ते प्रत्यक्ष कृतिशीलतेपर्यंतचा प्रवास व्हायला हवा. आपल्या संस्कृतीमधलं विज्ञान मुलांना समजायला हवं आणि विज्ञानातली नैतिक संस्कृती सुद्धा उमगायला हवी. खिशाला पटणं आणि मनाला पटणं यातला फरक नव्या पिढीला शिकवायला हवा. पर्यावरणाच्या स्वास्थ्याला आणि राष्ट्रीय हिताला ज्या गोष्टी हिताच्या नाहीत, त्या कितीही आर्थिक मोबदला देणाऱ्या असल्या तरीही त्या नाकारण्याचं धैर्य मुलांमध्ये यायला हवं. महिन्याभराचा अनलिमिटेड डेटा पॅक मारुन घरात निवांत बसून सोशल मीडियावर वाट्टेल तसं व्यक्त होण्यात काहीही कर्तृत्व नाही, उलट ते लाज आणणारं लक्षण आहे, हेही घडवणं आता संस्कारांचा भाग झालंय. महापुरुषांचे विचार कृतीमध्ये आणण्यासाठी आणि अनुकरण करण्यासाठी असतात. डॉल्बी सिस्टिमपुढं नाचण्यानं ते विचार आपल्या व्यक्तिमत्वात येत नाहीत,हाही संस्कार आता नितांत गरजेचा झाला आहे. तरच 'आयुष्य म्हणजे इव्हेंट नसतो' हे पुढच्या पिढ्यांमध्ये रुजायला मदत होईल. म्हणूनच म्हणतो पालकमित्रांनो, उन्हाळी सुट्टीकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन बदला. मूल घडवण्याचा खरा अभ्यासक्रम फार व्हास्ट आहे आणि त्यात उत्तीर्ण होण्यासाठी आपल्याला स्वतःलाच पाण्यात उतरावं लागेल. मुलांच्या पाठीशी नाही तर त्यांच्या सोबत राहावं लागेल. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ह्या सगळ्याला मानेवरचं जोखड न समजता स्वतः डेव्हलपमेंटल मेंटॉर होण्यातला आनंदसुद्धा मनसोक्त लुटला पाहिजे. लक्षात घ्या,आपल्या मुलांना आपल्याच सक्रियतेची सगळ्यात जास्त गरज आहे. ती जबाबदारी आऊटसोर्स करता येणार नाही. केवळ जन्म दिल्यानं पालक होता येत नाही आणि शाळा, कोर्सेस, ग्राउंड, शिबिरं यांच्या फिया भरल्यानं संगोपन केलं असं म्हणता येत नाही. आपल्या मुलांच्या व्यक्तिमत्वाचं शिल्प अधिक देखणं घडवायचं असेल तर, शिक्षकांसोबत आपणही ती शिल्पकला शिकून घेणं गरजेचं आहे. टाकीचे घाव सोसल्याशिवाय मुलांना उत्तमपण येणार नाही अन् ते घाव आपणच घातल्याशिवाय आपलं पालकत्व सुफळ संपूर्ण होणार नाही. तेव्हां,पालकत्वाचं व्रत स्वतःच केलं तरच त्याचा लाभ आपल्या पदरी पडेल,अन्यथा....!

(लेखक मानसतज्ज्ञ, संचालक-प्रमुख,करिअर काऊन्सेलर, आस्था काऊन्सेलिंग सेंटर,पुणे.)

## वात्सल्यसिंधू आई



वात्सल्यसिंधू आई माझी तू
दया,माया,ममतेचा सागर ही तू !!
गर्भातच संस्कार करूनी
प्रेमानं हितगुज करुनी
डोहाळे सारे तुझे पुरवुनी
आवड निवड माझी सारी जपुनी
असह्य प्रसुती वेदना साहुनी
जन्म दिला मला तू माऊली !!
कर्तव्यदक्षतेने तुझिया आई
उच्चपदी विराजमान झाले मी
सुसंस्कारांनी तुझ्या गं आई
दोन्ही कुळांची माझ्या शान वाढली
धन्य धन्य तू माय माऊली
माझ्या जीवाची तू गं साऊली !!
झाले बघ आता मी ही आई
माझ्या बाळाला जन्म देवुनी
तुझ्यासम माया ममता ही सारी
आली गं आई माझ्याही ह्रदयी
चिमण्या पाखराला या माझ्याही
वाढवीन मी ही जिवापाड जपुनी !!
झाले जरी आई मी गं मोठी
माया मूर्त तुझीच मी पाही
तुझी माया,ममता गं न्यारी
ना मिळे कधी कुठल्याही बाजारी
कसली ही उणीव नसली तरी
आई तुझ्याविना गं मी भिकारी !!
जीवनाची मम करुण कहाणी
कुणी पुसे ना तुज वाचुनी
येशील परतून कधी गं आई ?
सांग ना हळूच तू माझ्या कानी
तुझिया कुशीत सामावण्याची
आस पुरवाया पुन्हा तू ये ना आई
आई माझी !!

-विमल प्रकाश पाटकरी
धुळे, मो.९०२८०५५९११

# भगवान बुद्धांचा उच्च-ध्येयतम जीवनमार्ग

(पान ३ वरुन) आहे. त्यांनी योग्य मार्गाने मिळणाऱ्या ऐश्वर्याचे स्वागतच केले आहे. गरिबांनी आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी नेटाने प्रयत्न केले पाहिजेत. अमर्याद लोभ वाईट असतो. कारण अमर्याद लोभातून मारामाऱ्या, आघात, झगडे, वाद-विवाद, निंदा, असूया, असत्य, द्वेष या सर्वच वाईट गोष्टी जन्माला येतात आणि माणूस अमानुषतेकडे वाटचाल करू लागतो. मनुष्यप्राणी परिवर्तनशील आणि संवर्धनशील आहे. आयुष्यातील कोणत्याही दोन क्षणी तो तोच असत नाही; याचा अर्थ तो जिवंत असताना सारखा बदलत असतो. सर्वच अनित्य असल्याने माणसांमध्ये परिवर्तन शक्य आहे. ऐहिक जगात प्रत्येक क्षणाला परिवर्तन सुरू असते. यालाच शून्यवाद म्हणतात. शून्य म्हणजे अभाव नव्हे. एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात जीवनाचे होणारे उत्क्रमण किंवा सजीव वस्तूंचा विकास म्हणजे शून्यवाद होय. हा विचार मानणे म्हणजे धम्म होय.

कर्माच्या संदर्भात विचार करताना बुद्ध म्हणतात- कर्म हे जगातील नैतिक व्यवस्थेचा आधार आहे. किंबहुना असे मानणे म्हणजे धम्म होय. जगात काही सुव्यवस्था आहे. ग्रहगोलांच्या चलन-वलनात आणि ऋतुचक्रांमध्येही काही सुव्यवस्था आहे. सृष्टीच्या चांगल्या नैतिक व्यवस्थेची जबाबदारी जशी माणसावर आहे तशी वाईट व्यवस्थेचीही जबाबदारी माणसावरच टाकली आहे. कर्मविधान म्हणजे कर्माचा परिणाम. समाजातील माणसे चांगली कर्मे किंवा सर्वांच्या कल्याणाच्या कृती करीत असतील तर समाजाची नैतिक व्यवस्था चांगली राहील. व्यक्तीच्या कृतीचा किंवा कर्माचा संबंध समाजातील नैतिक व्यवस्था उत्तम ठेवण्याशी आहे. सदभाग्य किंवा दुर्भाग्याशी या कर्माचा संबंध नसतो. अधम्माचा विचार करताना बुद्ध म्हणतात- दैवी चमत्कारावर, ईश्वरावर, दैवावर विश्वास ठेवणे म्हणजे अधम्म होय. भ्रमाला कवटाळणारी माणसाची प्रवृत्ती म्हणजे अधम्म होय. तसेच बुद्धिवादाकडे, परिवर्तनाकडे पाठ फिरवणे म्हणजे अधम्म होय. अधम्माची वैशिष्ट्ये वर्णन करताना ते म्हणतात- मनातील दृष्ट विचार नष्ट करणे म्हणजे मनाची मलिनता दूर करणे. ज्या माणसाच्या मनात दृष्ट विचार असतात त्याचे जगणे, त्याच्या सर्व कृती आणि उक्तीही दृष्ट होऊन जातात. मन हे आचार-विचारांचे मूळ आहे. तेच आज्ञा करते तेच घटना घडवून आणते. मनात चांगले विचार असतील तर शब्द आणि कार्ये दोन्ही चांगली असतात. थोडक्यात काय तर मन निर्मळ करणे हाच सदधम्म आहे.

आपल्या या उच्चतम जीवनमार्गासाठी बुद्धांनी बुद्धसंघाची संकल्पना मांडली. बुद्धसंघ म्हणजे धम्मानुसार जीवन जगणारा समाज. बुद्धसमाज हा जाती नसलेला, पोटजाती नसलेला समाज होय. तसेच अंधश्रद्धा, विषमता, द्वेष, असुया नसलेला समाज म्हणजे बुद्धसंघ होय. या समाजात धार्मिकता नसते, देवदैववाद नसतो. बुद्धसंघ हा बुद्धीवाद्यांचा, नास्तिकता नीतिमान समाज असतो; बुद्धसंघ म्हणजे निरीश्वरवादी जीवन जगणारा समताधिष्ठित समाज होय. अशा या संघाचे पालन आणि प्रसार करणारा व्यक्ती भिक्खू असतो. भिक्खू म्हणजे बुद्धांचा आदर्श समाजाचा मार्ग दाखवणारा प्रकाश होय. वैशाख पौर्णिमेला जन्मलेल्या भगवान बुद्धांच्या उच्च-ध्येयतम जीवनमार्गावर चालण्याचा आपण संकल्प करूया!

## पान १ वरुन

### भारत-पाक युद्ध थांबले!

आज दुपारी फोन सुरू केला, त्यानंतर चर्चा झाली आणि समझोता झाला. इतर कोणत्याही ठिकाणी इतर कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विक्रम मिसरी यांनी दिली आहे. पाकिस्तानच्या डीजीएमओने दुपारी ३.३० वाजता चर्चेसाठी पुढाकार घेतल्यानंतर भारताच्या डीजीएमओशी बोलणे झाले. या चर्चेत दोन्ही बाजूंनी सर्व प्रकारचे हल्ले रोखण्यावर सहमती झाली. दरम्यान १२ मे रोजी १२ वाजता पुन्हा एकदा चर्चा होणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. भारत आणि पाकिस्तानने आज गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याबाबत एक सामंजस्य करार केला आहे. भारताने सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्ध सातत्याने ठाम आणि तडजोड न करणारी भूमिका कायम ठेवली आहे, ती पुढेही कायम राहील, असे भारताचे परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी सांगितले आहे.

### विहिरीत उडी मारुन आत्महत्या

अधिकाऱ्यांनी तपासून ममता गणेश हरदास या महिलेसह विद्या गणेश हरदास, साई गणेश हरदास या दोन्ही चिमुकल्यांना मृत घोषीत केले. याबाबत मयत महिलेचा पती गणेश प्रकाश हरदास (चित्रकथे) यांनी नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात खबर दिली आहे. त्यानुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून तपास पोलिस निरीक्षक सुनिल भाबड करीत आहेत. दरम्यान दोन चिमुकल्यांसह मातेने विहीरीत उडी मारल्याचे कळताच वावद गावातील लोकांनी शेतातील घटनास्थळी धाव घेतली. विहीरीत उडी मारलेल्या तिघांचा मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली. घटनास्थळी नंदुरबार तालुक्याचे पोलिस, अधिकारी व कर्मचारी दाखल झाले होते.

### जवान भारतमातेच्या सेवेस रवाना..

आहेत. नंदुरबार येथील सुपुत्र असलेले केंद्रीय सुरक्षाच्या दलातील जवान किशोर भगवान माळी यांनाही तात्काळ सैन्य दलाने बोलविले. भावाच्या लग्नाअगोदरच सैन्य दलाने बोलविताच त्यांनी कर्तव्याला प्राधान्य देत जवान किशोर माळी हे देश सेवेसाठी तात्काळ सीमेवर नऊ मे रोजी रात्री लगेच रवाना झाले. घरात लग्नाचे वातावरण सुरू असताना, लग्नाला अवघे चार दिवस बाकी असताना जवान सीमेवर भारत मातृभूमीच्या रक्षणासाठी निघाला.

भारत व पाकिस्तान या दोन देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती आहे. भारततर्फे ऑपरेशन सिंदूर राबविण्यात येत आहे. मात्र पाकतर्फे वेगवेगळ्या कुरापती सुरू आहेत. भारतीय सेना पाकला सडेतोड उत्तर देत आहे. अशा परिस्थितीत नंदुरबार येथील सुपुत्र जवान किशोर माळी हे भावाच्या लग्नासाठी आले असताना त्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या. त्यामुळे ते गावाकडे आल्यानंतर काही तासातच युद्धासाठी रवाना झाले. ते नंदुरबार शहरातील माळीवाडा परिसरात राहतात. तेथील नागरिकांनी डीजेवर देशभक्तीपर गीते लावत मोठ्या संख्येने उपस्थित राहत जवानाला रवाना केले.

### गौतम बुध्द जयंती, महाप्रसादाचे वाटप

नाशिककर, जितेंद्र चौवटीया, चेतन गांधी यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. प्रतिमापूजन ॲड.मधुकर भिसे, डॉ.सुशिल महाजन, शिवाजीराव मराठे, डॉ.परिक्षीत देवरे, बंटी टाईल्सवाले, रतन सुडके करणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून सुधाकर बेंद्रे, डॉ.विनोद छाजेड, मिलींद सोनवणे, सोनल शिंदे, जितेंद्र जगताप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमासाठी उपस्थितीचे आवाहन नारायण अहिरे यांनी केले आहे.

### तापी मेगा रिचार्ज प्रकल्प

पाण्याच्या आणि सिंचनाच्या समस्या आहेत, तेथे मोठा लाभ या प्रकल्पामुळे होणार आहे. यात जळगाव, अकोला, अमरावती, बुलढाणा या पट्ट्यात मोठा दिलासा मिळेल. शेतकऱ्यांच्या जीवनात मोठी क्रांती होईल आणि अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल. केंद्रीय योजना म्हणून याचा स्वीकार व्हावा, अशी विनंती आता आम्ही दोन्ही मुख्यमंत्री मिळून केंद्र सरकारकडे पुन्हा करणार आहोत. या बैठकीत महाराष्ट्राचे मुद्दे सुद्धा आम्ही मांडले. त्यात डांगुर्ली बॅरेज, जामघाट असे महत्त्वाचे मुद्दे होते. या जामघाट प्रकल्पासाठी २८ वर्षांपूर्वी मी मध्यप्रदेशात तत्कालिन मुख्यमंत्र्यांसोबत आलो होतो. पण, आता त्यालाही गती मिळते आहे, याचा आनंद आहे. या जामघाटमुळे नागपूर शहरासाठी पुढच्या ३०-४० वर्षांसाठी पाणी मिळणार आहे. आता ऑक्टोबरमध्ये पुढची बैठक घेण्यात येईल. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश कोणत्या क्षेत्रात एकत्रित काम करु शकते, यादृष्टीने सुद्धा अनेक बाबींवर यावेळी चर्चा झाली, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

### पाकिस्तानी हॅकर्सपासून सावधान

सेंटींगजमध्ये जावून टू फॅक्टर ऑथेंटिकेशन नेहमी ऑन ठेवावे, आपल्या फोनमध्ये ऑटो डाउनलोडचे ऑप्शन बंद ठेवा जेणेकरुन तुमच्या फोनमध्ये आपोआप कुठल्याही फाईल्स डाउनलोड होणार नाहीत. तसेच अज्ञात नंबरव्दारे फोटो किंवा व्हिडीओ येत असेल तर डाउनलोड करु नये. देशाचे शूर सैनिक सीमारेषेवर देशाचे रक्षण करत आहे तर आपणही सर्व मिळून आपले कर्तव्य पार पाडू आणि देशाला सायबर सुरक्षित बनवू असे आवाहन ॲड. चैतन्य भंडारी यांनी केले आहे. जर आपल्यासोबत काही सायबर फसवणुक झाली असेल तर आपण राष्ट्रीय टोल फ्री क्र.१९३० किंवा महाराष्ट्र सायबर हेल्पलाईन नं. १९४५ या टोल फ्री क्रमांकावर आपली तक्रार न चुकता नोंदवावी, असेही ॲड.भंडारी यांनी म्हटले आहे.

### आंतरराष्ट्रीय संस्थेकडून निधी

टेक्नॉलॉजी, धुळे येथे आहे. कम्युनिकेशन सोसायटी विद्यार्थी प्रमुख रिया पटेल आणि टीम यांनी हा निधी मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, एस.व्ही. के.एम. एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटी प्रेसिडेंट व चान्सलर सौ.स्नेहा पारीख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, मार्गदर्शक डॉ. अजय पसारी, प्राचार्य डॉ.निलेश साळुंके यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

### कर्ज काढुन देण्याचे अमिष दाखवले

नॅशनल बँकेत खाते उघडण्यात आले. बँकेकडून मिळालेले पासबुक हेमंत शिरसाठ यांना न सांगता गौतम शिरसाठ यांनी बँकेशी संपर्क साधला. कर्ज देण्याच्या बहाण्याने हेमंत शिरसाठ यांना न विचारता बँक खात्यावर परस्पर व्यवहार करण्यात आला. दि.७ एप्रिल रोजी हेमंत शिरसाठ बँकेत चौकशीसाठी गेले असता त्यांच्या नावाने तयार केलेले बँक खाते सायबर सेलकडून बंद करण्यात आल्याचे दिसुन आले. याप्रकरणी हेमंत शिरसाठ यांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावून तक्रार दाखल केली. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार न्यायालयाने आदेश दिल्याने नरडाणा पोलीस स्टेशनला गौतम शिरसाठ यांच्या विरूध्द गुन्हा ठकबाजीचा गुन्हा करण्यात आला.

### विविध प्रकरणांचा झाला निपटारा

आनंद साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कौटूंबिक न्यायालयामध्ये असलेल्या कौटुंबिक वादामुळे पती पत्नी मागील आठ वर्षांपासून वेगळे राहत होते. दाम्पत्यास एकवीस वर्षीय मुलगा, सोळा वर्षीय मुलगी आहे. दि.१० मे रोजी राष्ट्रीय लोकअदालतमध्ये योग्य समुदपदेशन द्वारे वाद अखेर निकाली काढण्यात आला. मोटर अपघाताच्या एका प्रकरणात मयताच्या वारसांना एकुण चाळीस लाख रूपये नुकसान भरपाई मंजुर करण्यात आली. राष्ट्रीय लोक अदालतसाठी धुळे जिल्हा वकील संघ तसेच तालुका वकील संघ, पक्षकार, पोलीस, सर्व बँका, सर्व ग्रामपंचायत, महावितरण कंपनी यांनी सहकार्य केल्याने धुळे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव संदीप वि.स्वामी साहेब यांनी आभार व्यक्त केले.

## निधन वार्ता

### गंगाराम पाटील



धुळे, दि.१०- धुळे तालुक्यातील सांजोरी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गंगाराम मोतीराम पाटील यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा दि.११ मे रोजी सकाळी ९ वाजता सांजोरी येथून काढण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. ते जे.एफ.पाटील यांचे सासरे होत.

### खुशाल शिंदे-भोई



धुळे, दि.१०- देवपूर ग.द.माळी हौसिंग सोसायटी येथील रहिवासी सेवानिवृत्त एसएआय खुशाल यादव शिंदे-भोई यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७० वर्षांचे होते. एकवीरा देवी जवळील अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ते सामाजिक कार्यकर्ते गणेश मोरे यांचे पाहुणे होत.



## शहाद्यात महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**शहादा, दि.१० (का.प्र.)- शहरात राष्ट्रगौरव वीर शिरोमणी महापुरुष श्री महाराणा प्रतापसिंह यांची तारखेप्रमाणे जयंती दि.९ मे रोजी मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात श्री महाराणा प्रतापसिंह स्मारकाच्या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली.**

यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी तसेच समाज बांधवांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अभिवादनाच्या वेळी तहसीलदार दीपक गिरासे, उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार, पोलीस निरीक्षक निलेश देसले,नायब तहसीलदार शैलेंद्र गवते, धडगाव येथील गटशिक्षण अधिकारी राजपूत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते अजय शर्मा, पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे संचालक व युवा नेते मयूरभाई पाटील, सातपुडा शिक्षण संस्थेचे सचिव प्रा.संजय जाधव, बजरंग दलाचे जिल्हाध्यक्ष राजा साळी, शहादा पंचायत समितीचे माजी सभापती डॉ.सुरेश नाईक, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र वाघ, शहादा तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती माजी उपसभापती रवींद्र रावल, सप्तशृंगी माता मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र भटुलाल अग्रवाल, सामाजिक कार्यकर्ते पिनाकिन पटेल, माजी नगरसेवक रवींद्र जमादार, जिल्हा मजूर फेडरेशनचे राजूदादा गिरासे, सामाजिक कार्यकर्ते अनिल भामरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष एन.डी. पाटील, माकपाचे तालुका अध्यक्ष कॉ. सुनील गायकवाड, माजी ज्येष्ठ नगरसेवक के.डी.पाटील, शहादा शहर भाजपा अध्यक्ष व माजी नगरसेवक ज्ञानेश्वर चौधरी, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष प्रा. आर.टी.पाटील, डॉ.लक्ष्मण सोनार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संजय कासोदेकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार गटाचे शहराध्यक्ष सुरेंद्र कुवर,सामाजिक कार्यकर्ते सतीश जव्हेरी, जायट्स ग्रुप माजी अध्यक्ष भूषण बाविस्कर, प्रवासी महासंघाचे अध्यक्ष ईश्वर पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुनील काशिनाथ पाटील, महावीर पतसंस्थेचे संचालक समीर जैन, संचालक ललित छाजेड, शहादा शिवछत्रपती ग्रुपचे अध्यक्ष विजय चौधरी, शिवसेनेचे उत्तम पाटील, प्रा.डॉ.हिमांशू जाधव, तुषार गोसावी, चतुर्भुज शिंदे यांच्यासह राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे संस्थांचे पदाधिकारी, समाज बांधव व शहादा तालुका राजपूत समाज मंडळाचे सर्व पदाधिकारी, मयुरी ट्रॅव्हल्स ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी सामाजिक सेवेत अग्रेसर असलेल्या शहादा संकल्प ग्रुपचा डोंबिवली येथील हेल्पिंग वेल्फेअर सोसायटीतर्फे नवरत्न पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल संकल्प ग्रुपचे अध्यक्ष सुरेश चव्हाण यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. तर श्री महाराणा प्रतापसिंह स्मारक परिसरातील गरजू व होतकरू मुलांना गेल्या दोन वर्षापासून सप्तशृंगी माता मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र भटूलाल अग्रवाल यांच्यातर्फे टीशर्ट वाटप करीत असतात. यावर्षी देखील जयंतीच्या निमित्ताने मुलांना टीशर्ट वाटप केले तर सामाजिक कार्यकर्ते पिनाकिन पटेल यांनी मुलांना फराळ भेट म्हणून दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय राजपूत यांनी केले. आभार अजबसिंग गिरासे यांनी मानले.

धुळे- साक्री रोड परिसरातील लुंबिनी वन बुध्द विहार येथे लुंबिनी वन बहुउद्देशिय सामाजिक संस्था व गुंजन महिला फाऊंडेशन धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने तथागत गौतम बुध्द जयंती निमित्ताने दि.२४ मे रोजी सकाळी अकरा ते दुपारी

### बौध्द धर्मिय विवाह सोहळ्याचे आयोजन

चार वाजेच्या कालावधीत बौध्द धर्मिय विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.शैक्षणिक पात्रता असलेल्या उपवर वधु-वरांना या परिचय मेळाव्यात सहभागी करण्याचे पालकांना आवाहन करण्यात आले आहे. नाव नोंदणी लुंबिनी वन बहुउद्देशीय संस्थेच्या सिध्दार्थ सार्वजनिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल भटेसिंग पानपाटील यांच्याकडे करावी. अधिक माहितीसाठी अशोक वाघोदे, बी.बी. साळवे, गुंजन महिला फाऊंडेशनच्या अध्यक्षा संगिता खैरनार, उपाध्यक्षा मेघा गायकवाड यांच्याशी संपर्क साधावा. समाजबांधवांनी मेळाव्या मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन कार्याध्यक्ष प्रा.ईश्वरचंद्र खैरनार यांनी केले आहे.

## पान १ वरुन

### राज्यभरात आज तिरंगा रॅली

त्यानंतर, भारतीय सैन्य दल आणि भारत सरकारच्या समर्थनार्थ अनेक जिल्ह्यात ही रॅली निघणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही या रॅलीत सहभाग असणार आहे. यांसह, महायुतीमधील अनेक मंत्री आपआपल्या जिल्ह्यातून या रॅलीत सहभाग घेणार आहेत. मात्र, राष्ट्रवादीकडून तिरंगा रॅलीचे नियोजन नसून अजित पवार हे नांदेड दौ-यावर आहेत. ते शहीद कुटुंबीयांची भेट घेणार आहेत.

### लहान वयात मोठी झेप

कौशल्याचे कौतुक केले. या वेळी उपस्थित इतर महिला उद्योजकांनीही सागरला रोख रक्कम देऊन सन्मानित केले.आय.आय.सी. संयोजक प्रा.पी. एस. दाभाडे यांनी व्हीलचेअरचा उपयोग रुग्णांसाठी उपयुक्त ठरणारा असल्याचे सांगत उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.भारती साक्षी हिने केले.या आयोजनासाठी डॉ. पी.बी. निनावे, प्रा.झबिउल्लाह खाटीक, गणेश गोसावी, मगन पावरा, पंडित हिरे, यशवंत मराठे यांनी सहकार्य केले.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून ठोस ग्वाही

होते. या आश्वासनाची पुर्तता करण्यासाठी व शेतकऱ्यांच्या विविध मागण्या सोडविण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडेही करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी नंदुरबार येथील जिल्हाधिकारी कार्यालयात सत्यशोधक शेतकरी सभा व सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत चर्चा करुन विविध मागण्या सोडविण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना सूचना केल्या. तसेच येत्या काही दिवसात मागण्याबाबत पुर्तता न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा ईशाराही सत्यशोधकच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीत दिला. याप्रसंगी करणसिंग कोकणी, आर.टी. गावित, रणजीत गावित, दिलीप गावित, विक्रम गावित, शितल गावित, गेवाबाई गावित, लिलाबाई वळवी, जमनाबाई वळवी, उत्तम गावित, साईद कुरेशी, सेल्या गावित, दिवाण गावीत, रामदास गावीत, गोबजी गावित, राजेश गावित, जालमसिंग गावित, सुनील वळवी, प्रभाकर गावित, विक्रम गावीत आदी उपस्थित होते.

**बेचना है**
१४ चक्का ट्रॉला अशोका लीलेण्ड MKW 79042022 मॉडेल, टॉप एवन कंडीशन, वेल मेन्टेन इंजिन बॉडी, डबल मजबुती, हैवी सस्पेन्शन, नये टायर ट्यूब, टॅक्स बीमा सहीत.
-: संपर्क :-
9425700095

**दुकान भाड्याने देणे आहे**
आग्रारोड वरील द्वारकामाई लॉजपासून जवळ 13x52 जागा ऑफिस, एजन्सी, फायनान्स, इन्शुरन्स कंपनी, शोरुम, मोबाईल गॅलरी, मेडिकल, कापड दुकान इत्यादीसाठी उपयुक्त जागा
8856988100

**पाहिजेत**
धुळे शहरातील विमा क्षेत्रात कार्यरत कार्यालयीन काम काजासाठी असिस्टंट व मॅनेजर पदासाठी उमेदवार पाहिजेत.
* पदवीधर व कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक.
-: संपर्क :-
9423451280

**पाहिजेत**
१) सेल्स एक्झेकेटीव्हज - ६ पदे (पदवीधर)
२) शोरुम होस्टेस/रिसेप्शनिस्ट- २ पदे (पदवीधर. कॉम्प्युटरचे ज्ञान. उत्तम संभाषण कौशल्य.)
३) ऑफिस एक्झेकेटीव्ह - २ पदे (पदवीधर. कॉम्प्युटरचे ज्ञान. अनुभव असल्यास प्राधान्य.)
४) सुरक्षा रक्षक - ४ पदे (१० वी पास) वरील पदांचा अनुभव असल्यास प्राधान्य.
उज्वल ऑटोमोटीव्हज् प्रा.लि.
मुंबई-आग्रा रोड, अवधान, धुळे. मो.9225640005
Email ID - hr@ujwalauto.com




**पाहिजे**
मॅटर्निटी हॉस्पिटल मध्ये रात्पाळीच्या कामासाठी सिस्टर आणि स्विपर पाहिजे. अनुभव असल्यास प्राधान्य. समक्ष येऊन भेटा!
डॉ.नितीन कुलकर्णी
कुलकर्णी मॅटर्निटी हॉस्पिटल, संतोषी माता चौक, धुळे
9371480325

**घर विकणे आहे**
गल्ली नं.५ नगरपट्टी जवळील सर्व सोयीयुक्त घर विकणे आहे
-: संपर्क :-
8956702523
9422775660

**फ्लॅट विकणे आहे**
अशोक नगर, एलआयसी कॉलनी जवळ फुल फर्निश्ड लक्झरी फ्लॅट विकणे आहे
-: संपर्क :-
7972567859

**रोडटच शेती विकणे**
चाळीसगाव रोडटच, साक्रीरेड टच, मालेगाव रोडटच, नगावबारी रोडटच, पारोळा रोड टच शेती विकणे आहे.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**मालेगाव रोडटच प्लॉट**
मालेगाव रोडटच दोन रोड कॉर्नर शॉपींग कॉम्प्लेक्ससाठी उपयुक्त २ प्लॉट विकणे आहे.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**मोक्याचा प्लॉट विकणे**
फ्लॅट सिस्टीम, शॉपींग कॉम्प्लेक्ससाठी उपयुक्त ५००० ते ७००० चौरस फूटाचे प्लॉट विकणे. वल्लभ नगर, वैभव नगर, स्टेशन रोड, जमनागिरी रोड, दत्तमंदिर चौक, गोंदुर रोड, वाडीभोकर रोड, पारोळा रोड, स्नेहनगर, मालेगाव रोड
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**कार्टून पुठ्ठा**
रु.१६.०० प्रति किलो बंडल
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाउंड भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**पाहिजेत**
नवीन ऑफिस करिता मुला/मुलींची डायरेक्ट भरती
पात्रता- १० वी पास/नापास ते पदवीधर व १८ ते ३० वर्षे पगार ७५००/- ते २५०००/- हजार
रहाणे+जेवण मोफत
संपर्क :- पत्ता:- वाडीभोकर रोड, धुळे मो.९६५७६०८४५९

**पाहिजेत**
१) सिलेंडर डिलीवरीसाठी माणूस पाहिजे.
२) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत.
कल्पतरु गॅस एजन्सी
वाडीभोकर रोड, धुळे
9860652090

**पाहिजेत**
दुकान कामासाठी मुलगा पाहिजे
-: संपर्क :-
9809909953

**पाहिजेत**
Petrol Pump कामासाठी मुलगा पाहिजे
-: संपर्क :-
9422296337

**पाहिजेत**
१) छोटा हत्तीसाठी (Driver) ड्रायव्हर पाहिजे. लायसेन्स होणे आवश्यक.
२) ऑफिस कामासाठी (Helper) हेल्पर पाहिजे.
३) खारी/टोस्टच्या मार्केटींगसाठी सेल्समन पाहिजे.
लाईफ लाईन बेकरी
मालेगावरोड, धुळे
7507699616 / 8275103509

**पाहिजेत**
१) रेडिमेड कापड दुकानासाठी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजेत. पगार १००००+ कमिशन
२) टेलर कामासाठी पूर्णवेळ टेलर पाहिजे. प्रत्यक्ष भेटा!
महावीर ड्रेसेस
फुलवाला चौक, आग्रारोड, धुळे

कुलिंग इंडिया की पहचान
Symphony
Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स'



आता खरेदी करा कूलर 0% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०